cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–९ | शुक्रवार दि.१९ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

संपादकीय

मान्सून अंदाजाने दिलासा मात्र सद्य स्थिती भयावह !

देशात वर्षभर होणाऱ्या पावसापैकी ७० टक्के पाऊस हा मान्सूनच्या काळातच पडतो. देशातील ७० ते ८० टक्के शेतकरी शेतीसाठी मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहेत. मान्सून कमी झाल्यास शेती उत्पादन घटते, त्यामुळे महागाईत वाढ होते. देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषि क्षेत्राचा हिस्सा २० टक्के आहे. देशाच्या अर्ध्या लोकसंख्येला त्यातून रोजगार मिळतो. चांगला पाऊस पडल्यास चांगले उत्पन्न मिळू शकते.

नाशिकमध्ये स्वाइन फ्लूचा शिरकाव, महिलेचा मृत्यू

नाशिकः उन्हाळ्यामुळे आधीच नागरिक हैराण झाले आहेत. उष्माघातामुळे नागरिकांचे आरोग्य बिघडत आहे. त्यातच आता नाशिककरांची झोप उडवणारी बातमी समोर येत आहे. नाशिकमध्ये स्वाइन फ्लुचा शिरकाव झाला आहे. स्वाइन फ्लुची लागण झाल्यानंतर सिन्नरच्या एका महिला मृत्यू झाला आहे. तर, आणखी तीन रुग्ण समोर आले आहेत. स्वाइन फ्लुचे रुग्ण सापडल्यानंतर प्रशासन अलर्ट मोडवर आले आहे. आरोग्य विभागाने काही मार्गदर्शक तत्वे जाहीर केली आहेत. उन्हाळ्यात वाढ होत असताना स्वाइन फ्लुच्या संसर्गातही वाढ होते. नाशिकमध्ये स्वाइन फ्लुमुळं एका महिलेचा मृत्यू झाला आहे तर अन्य दोघांवर उपचार सुरु आहेत.

शेतकऱ्यांची वणवण, राज्य सरकारचे दुर्लक्ष

पुणे । प्रतिनिधी

राज्यात ४० तालुक्यात दुष्काळ जाहीर करण्यात आला. दरम्यान उन्हाळाची तीव्रता आणखी वाढू लागल्याने अनेक जिल्ह्यात दुष्काळाच्या झळा गडद होताना दिसत आहे. काही जिल्ह्यात जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर होत चालला आहे तर काही जिल्ह्यात टँकरद्वारे पाणी देण्याची वेळ आली आहे. दरम्यान, राज्यात भीषण पाणी टंचाई आणि जनावरांच्या चाऱ्याची गंभीर परिस्थिती जाणवत असताना राज्य सरकार नेमकं काय करत आहे? यर आता जनसामान्यातून प्रश्न उपस्थित केला जात आहे.

राज्यात चारा–पाणी संकट डोक्यावर

भाजून काढणाऱ्या उन्हात पाण्यासाठी दाही दिशा भटकंतीची वेळ राज्याच्या काही भागांत आलेली असताना दुसऱ्या बाजूला चारा टंचाईची भीषण समस्या भासू लागली आहे. मात्र, निवडणुकांच्या रणधुमाळीत चारा टंचाईचे वास्तव राज्यकर्त्यांच्या दृष्टीस येत नसल्यामुळे राज्यातील पशुपालकांसमोर भीषण संकट उभे राहिले आहे. पश्चिम महाराष्ट्रात

९० लाख जनावरांचा सांभाळ कसा करायचा?

आचारसंहितेमुळे शासनाला चाऱ्याच्या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेता येत नसल्याचे सरकारी अधिकारी सांगत आहेत. त्यामुळे वाढत्या पाणी व चाराटंचाईमुळे राज्यातील ९० लाख पशुधन पुढील दोन महिने कसे सांभाळायचे, असा बिकट प्रश्न तयार झाला आहे. परिस्थिती हाताबाहेर गेल्यास चारा परराज्यांतून किंवा विदेशातून आयात करण्याची वेळ येऊ शकते, असे सूत्रांचे म्हणणे आहे.

चाऱ्याची उपलब्धता त्यातल्या त्यात बरी आहे. तरीदेखील संभाव्य टंचाई विचारात घेत पशुसंवर्धन विभागाने चारा बियाण्यांचे वाटप केले आहे. नाशिकच्या नांदगाव, सिन्नर, चांदवड व येवला तालुक्यात चाराटंचाई आहे. नांदगाव तालुक्यात पशुपालक भयावह समस्येत ◀◀ पान २ वर

आज पहिल्या टप्प्याचे मतदान

देशातील १६.६३ कोटी मतदार ठरविणार १६२५ उमेदवारांचे भवितव्य

मुंबई । प्रतिनिधी

शुक्रवार दि. १९ एप्रिल रोजी सकाळी पहिल्या टप्प्यातील मतदान सुरू होईल. म्हणजेच, देशातील शेकडो उमेदवारांचे भविष्य, कोट्यवधी मतदारांच्या एका बोटात असेल. दरम्यान, पहिल्या टप्प्यातील मतदानापूर्वी देशातील सर्व मतदारांनी उत्साहाने मतदान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी केले. त्यांनी एक व्हीडीओ जारी केला, ज्यात मतदानाचा अनुभव शांत, आरामदायी आणि आनंददायी करण्यासाठी निवडणूक ◀◀ पान २ वर

जिल्ह्याला विकासाच्या उंचीवर नेण्यासाठी साथ द्या-पंकजा मुंडे

आष्टीत अभूतपूर्व सभा ; प्रचार सभेला तोबा गर्दी

आष्टी । प्रतिनिधी

प्रचारासाठी गावोगावी जाताना लोक भेटतात. पूर्वी मी केलेल्या कामांची यादी वाचतात, 'ताई तुमच्यामुळेच खूप मोठा निधी आला, कामे मार्गी लागली',असे सांगतात. पालकमंत्री असताना केलेल्या विकास कामाचे समाधान वाटते. सर्वसामान्य जनतेनेच माझा लोकसभेचा प्रचार हाती घेतला आहे याची प्रचिती येत आहे. मागच्या निवडणुकीत या मतदारसंघाने सत्तर हजारांची मताधिक्य दिले आहे हा विश्वास यापुढेही कायम राहणार आहे. जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्यासाठी तुमचा हक्काचा माणूस म्हणून मी दिल्लीत काम करेल.'घडी गेली की पिढी जाते' त्यामुळे या निवडणुकीत चूक न करता जिल्ह्याच्या सर्वकष विकासासाठी प्रचंड मतांनी विजयी करा असे आवाहन भाजप–महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. दरम्यान स्वतःचा पराभव दिसत असल्याने भाजपवर बिनबुडाचे आरोप करून संभ्रम निर्माण करणाऱ्यांना जनता थारा देणार नाहीत, पंकजाताई मुंडे यांना प्रचंड मतांनी निवडून येतील असा विश्वास आ. सुरेश धस यांनी व्यक्त केला.

आष्टी शहरात त्यांची जाहीर सभा संपन्न झाली, यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर आमदार सुरेश धस, भाजपचे तालुकाध्यक्ष साहेबराव मस्के, शिवसेनेचे जालिंदर नागरे, नगराध्यक्ष जिया बेग, ◀◀ पान २ वर

शाळांना उन्हाळी सुट्टी जाहीर

पुणेःराज्यातील माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांना २ मे पासून सुट्ट्या जाहीर करण्यात आल्या आहेत. शिक्षण संचालनालयाने यासंदर्भात परिपत्रक काढले आहे. विदर्भ वगळता राज्यातील इतर ठिकाणी पुढील शैक्षणिक वर्ष १५ जूनपासून सुरू होणार आहे. शिक्षण संचालनालयाने जाहीर केलेल्या परिपत्रकानुसार संपूर्ण राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व शाळांची सन २०२४ ची उन्हाळी सुट्टी आणि शैक्षणिक वर्ष २०२४–२५ सुरू करण्यासंदर्भात सूचना देखील देण्यात आल्यात. पुढील शैक्षणिक वर्ष सन २०२४–२५ मध्ये विदर्भ वगळता इतर सर्व विभागातील राज्य मंडळाच्या शाळा १५ जून रोजी सुरू करण्यात येणार आहेत. जून महिन्यातील विदर्भाचे तापमान विचारत घेत विदर्भातील शाळाा १ जुलैपासून सुरू होणार आहे.

डीवायएसपी धीरजकुमार बच्चू यांनी राम जन्मोत्सव मिरवणुकीला गालबोट लावले

डॉ.ओमप्रकाश शेटे यांनी केला पत्रकार परिषदेत आरोप

माजलगाव । प्रतिनिधी

शहरामध्ये रामनवमीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते यातच बुधवार रोजी रात्री रामनवमीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीला चक्क पोलिसांकडूनच गालबोट लावण्याचा प्रकार हिंदू विरोधी भूमिकेतून वेगळा हेतु ठेवून डीवायएसपी धीरजकुमार बच्चू यांनी केला असल्याचा आरोप आयुष्यमान भारत मिशनचे महाराष्ट्र प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी पत्रकार परिषदेद्वारे केला आहे.

बुधवार रोजी रात्री रामनवमीनिमित्त निघालेल्या मिरवणुकीमध्ये उपविभागीय ◀◀ पान २ वर

इंडिया आघाडीच्या पारड्यात बीडचे एक मत टाकण्यासाठी प्रयत्नशील-खा.रजनीताई पाटील

काँग्रेसच्या बैठकीत बजरंग सोनवणेंना विजयी करण्याचा निर्धार

केज । प्रतिनिधी

देशात सर्वधर्म समभाव हा भाव वाचवण्यासाठी इंडिया आघाडीची स्थापना करण्यात आली त्यात काँग्रेस मोठ्या भावाच्या भूमिकेत आहे देशात सत्ता मिळवायची असेल तर एक एक खासदार महत्वाचा आहे म्हणून इंडिया आघाडीच्या पारड्यात बीडचे एक मत टाकण्यासाठी काँग्रेसचा प्रत्येक कार्यकर्ता प्रयत्नशील राहील अशी स्पष्ट ग्वाही काँग्रेसच्या नेत्या खा रजनीताई पाटील यांनी दिली

लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांच्या प्रचारार्थ आयोजित काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मेळाव्या प्रसंगी दिली.

रजनीताई पाटील यांच्या शिवनेरी या निवासस्थानी आयोजित या बैठकीला राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार ◀◀ पान २ वर

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या सर्वांची उमेदवारी रद्द करा

काँग्रेसचे अतुल लोंढे यांची निवडणूक आयोगाकडे पत्राद्वारे मागणी

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक प्रचार सुरु झाल्यापासून सत्ताधारी भाजपा, शिवसेना पक्षाने आदर्श आचारसंहितेचे वारंवार उल्लंघन केले आहे व त्याबाबतची रितसर तक्रारही काँग्रेस पक्षाने निवडणूक आयोगाकडे केलेली आहे. ◀◀ पान २ वर

आता किराणा दुकानातही मिळणार सर्दी-खोकल्याची औषधे?

केंद्र सरकार ओव्हर द काउंटर औषधांसाठी धोरण आणण्याच्या तयारीत

नवी दिल्ली । वृतसंस्था

गेल्या काही वर्षांपासून केंद्र सरकार नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने विविध पावले उचलत आहे. केंद्र सरकार लवकरच आता मोठा निर्णय घेण्याच्या तयारीत आहे. सर्दी, खोकला, ताप यासाठी वापरण्यात येणारी औषधे आता किराणा दुकानातही विक्रीसाठी उपलब्ध करून देण्याची तयारी सुरू आहे. केंद्र सरकार ओटीसी अर्थात ओव्हर द काउंटर औषधांसाठी धोरण आणण्याच्या तयारीत आहे. त्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती यासंदर्भात विचार करत आहे.

ओटीसी म्हणजे ओव्हर द काउंटर म्हणजे अशी ◀◀ पान २ वर

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१८ एप्रिल २०२३

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : ७.५० क्विंटल			
	२,३५०	२,३५०	२,३५०
ज्वारी/हायब्रिड : १६१.०० क्विंटल			
	१,८००	३,६००	२,६१८
मूग : ०.५० क्विंटल			
	९,८५०	९,८५०	९,८५०
तूर : ४०.५० क्विंटल			
	९,०००	११,००१	१०,४६९
उडीद : १.५० क्विंटल			
	५,०००	६,५०१	५,७५०
बाजरी: ३२.५० क्विंटल			
	२,५०१	२,६४५	२,५९५
चिंचोका/लोकल: ८.०० क्विंटल			
	२,४००	२,४००	२,४००
सोयाबीन: ११९.५० क्विंटल			
	४,६००	४,६७०	४,६३६
हरभरा: ११.०० क्विंटल			
	५,६५०	५,६५०	५,६५०

स्थानिक नेत्यांपेक्षा पवार-मुंडेंना मानणारा बीडचा मतदार

पाचपैकी चार लोकसभा निवडणुकीत भाजपला कौल

विशेष प्रतिनिधी । बीड

मतदार हा कोणत्या ना कोणत्या विचारधारेला जोडलेला असतो. बीड जिल्ह्यातील मतदारांची शरद पवार आणि गोपीनाथ मुंडे यांच्या विचाराशी नाळ जुळलेली आहे. स्थानिक नेतृत्वाला न मानता पवार–मुंडेंना मानणारा येथील मतदार आहे. १९९९ नंतर हा विचार प्रवाह स्पष्टपणे जाणवू लागला. पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस स्थापन केल्यावर बीड जिल्ह्यातील काँग्रेस लयास गेली. त्यामुळे कोणतीही निवडणुक असो की कोणीही उमेदवार असो खरा सामना हा मुंडे –पवार यांच्यातच होत होता. याचा प्रत्यय गेल्या पाच लोकसभा निवडणुकीत आला. पाचपैकी चार लोकसभा निवडणुकीत बीड जिल्ह्यातील मतदारांनी शरद पवारांपेक्षा गोपीनाथ मुंडे यांनाच कौल देत भाजपचे उमेदवार विजयी केले.

रेणापुर विधानसभा मतदार संघातून गोपीनाथ मुंडे आमदार झाल्यावर खऱ्या अर्थाने त्यांच्या राज्य पातळीवरील राजकारणाला सुरुवात झाली. त्याची झलक १९८४ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत काही प्रमाणात दिसून आली. पहिल्यांदा भाजप उमेदवाराला चांगली मते मिळाली होती. केशरकाकु क्षीरसागर यांना २ लाख २१४१, अपक्ष श्रीधर गीते १ लाख ११०५९ आणि भाजपचे आदिनाथ नवले यांना १ लाख २२६० मते मिळाली. यावेळी काँग्रेसमध्ये शरद पवार यांचा चांगलाच प्रभाव होता. त्यामुळे तो बीड जिल्ह्यावरही दिसून येत होता. १९९१ च्या निवडणुकीत भाजपचे सदाशिव मुंडे ◀◀ पान २ वर

यावेळीही मुंडे–पवार विचारधारेचीच लढाई

गेल्या काही बीड लोकसभा निवडणुकांचा कल पाहिला तर गोपीनाथ मुंडे विरुध्द शरद पवार असाच सामना झालेला आहे. यवेळी सुध्दा पंकजा मुंडे आणि बजरंग सोनवणे यांचा आमनेसामना नसून खरी लढाई मुंडे आणि पवार यांच्या विचारधारेची आहे.

मुंडेंसह पवारांकडूनही वेगवेगळे प्रयोग

गोपीनाथ मुंडे यांनी सुरुवातीच्या १९८४ साली आदिनाथ नवले, १९८९ आणि १९९१ च्या निवडणुकीत सदाशिव मुंडे यांना उमेदवारी दिली. त्यानंतर १९९६ साली राजकारणात नवख्या असलेल्या रजनी पाटील यांना भाजपात प्रवेश देत त्यांना केशरकाकु क्षीरसागर यांच्याविरोधात निवडूण आणले. १९९८ आणि १९९९ च्या निवडणुकीत जयसिंगराव गायकवाड यांचा प्रयोग यशस्वी केला. ते भाजपकडून दोनवेळा खासदार झाले. पुढे मुंडे–गायकवाड यांच्यात मतभेद झाल्याने शरद पवारांनी डाव टाकला आणि गायकवाड त्यांच्या गळाला लागले आणि खासदारही झाले. २००९ च्या निवडणुकीत स्वत: मुंडे यांनी उतरण्याचे ठरवून विजयही मिळवला. २०१४ साली ते पुन्हा विक्रमी मतांनी खासदार झाले. पुढे आजपर्यंत त्यांची कन्या प्रितम मुंडे याच बीडच्या खासदार आहेत. या दरम्यान शरद पवारांनी मुंडे व पुढे त्यांची कन्या प्रितम यांना शह देण्यासाठी मुंडे यांनी आमदार, जि.प. उपाध्यक्ष केलेल्या नेत्यांना आपल्याकडे घेत उमेदवारी दिली. मात्र यात रमेश आडसकर, सुरेश धस आणि बजरंग सोनवणे यांना यश आले नाही.

cmyk

अग्रलेख

मान्सून अंदाजाने दिलासा मात्र सद्य स्थिती भयावह!

देशात वर्षभर होणाऱ्या पावसापैकी ७० टक्के पाऊस हा मान्सूनच्या काळातच पडतो. देशातील ७० ते ८० टक्के शेतकरी शेतीसाठी मान्सूनच्या पावसावर अवलंबून आहेत. मान्सून कमी झाल्यास शेती उत्पादन घटते, त्यामुळे महागाईत वाढ होते. देशाच्या अर्थव्यवस्थेत कृषि क्षेत्राचा हिस्सा २० टक्के आहे. देशाच्या अर्ध्या लोकसंख्येला त्यातून रोजगार मिळतो. चांगला पाऊस पडल्यास चांगले उत्पन्न मिळू शकते. हवामान विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी दिलेल्या माहितीनुसार देशात यंदा सरासरीच्या १०६ टक्के पाऊस पडणार आहे.

हवामान विभागाने पावसाच्या प्रमाणाच्या पाच श्रेणी ठरवल्या आहेत. त्यानुसार ९० टक्क्यांपेक्षा कमी पाऊस म्हणजे अपुरा पाऊस तर ९० ते ९५ टक्के पाऊस म्हणजे सरासरीपेक्षा कमी, ९६ ते १०४ टक्के पाऊस म्हणजे सरासरीइतका पाऊस तर १०५ ते ११० टक्के पाऊस म्हणजे सरासरीपेक्षा अधिक आणि ११० टक्क्यांपेक्षा जास्त पाऊस सर्वाधिक पाऊस समजला जातो. हवामानाच्या प्रभावामुळे जून-जुलैमध्ये मान्सूनचा वेग मंद असेल परंतु त्याची भरपाई दुसऱ्या टप्प्यात (ऑगस्ट-सप्टेंबर) होईल. आयएमडीच्या माहितीनुसार २०२३ मध्ये ८२० मिमी पाऊस झाला होता. साधारणपणे ८६८.६ मिमी पाऊस पडतो. याआधी सलग चार वर्षे सामान्य ते जास्त पाऊस पडत होता. अल निनो आणि ला निनामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा अंदाज घेऊन हवामान विभागाने दीर्घकालीन अंदाज जाहीर केले आहेत. अल निनो जाऊन ला निना येत असल्याने त्याचा सकारात्मक परिणाम होणार असल्याचे महापात्रा यांनी म्हटले आहे. हवामान विभागाकडे असलेल्या सुमारे ७० वर्षांच्या आकडेवारीचा सविस्तरपणे अभ्यास करून हे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. त्यानुसार देशातील बहुतांश भागात चांगल्या पावसाची शक्यता आहे. उत्तर, ईशान्य आणि पूर्वेतील काही राज्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता आहे. हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजापेक्षा ५ टक्के कमी किंवा जास्त प्रमाणात पाऊस होऊ शकतो. असे असले तरी सरासरीपेक्षा पावसाचे प्रमाण जास्तच राहील. यंदा महाराष्ट्रातही चांगला पाऊस होईल असा अंदाज आहे. गतवर्षी सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यात सुपर अल निनोची स्थिती निर्माण झाली होती. त्याचा फटका बसल्यामुळे मान्सून तर कमी झालाच पण परतीचा पाऊसही हवा तसा नव्हता. गतवर्षी नोव्हेंबर ते मार्च दरम्यान अनेक ठिकाणी गारपीट झाली. यंदा तसे न होता एप्रिलमध्ये गारपीट झाली आणि येत्या काही दिवसांतही ती होऊ शकते. हे अल निनो आणि ला निनाच्या बदलत्या स्थितीचे संकेत आहेत. एकूण स्थितीचा विचार करता यंदा महाराष्ट्रात मान्सूनच्या पावसाबरोबरच मान्सूनपूर्व आणि परतीचा पाऊसही चांगला होऊ शकतो. प्रशांत महासागराच्या पाण्याचे तापमान जेव्हा नेहमीपेक्षा जास्त वाढते तेव्हा त्या स्थितीला अल निनो असे संबोधले जाते. वारे वेगाने वाहू लागल्यामुळे समुद्राच्या पाण्याचे तापमान वेगाने कमी होऊ लागते तेव्हा त्या स्थितीला ला निना असे म्हटले जाते. या दोन्ही स्थितीचा जगभरातील तापमानावर परिणाम होत असतो.

एप्रिल महिना अर्ध्यावर असताना तापमानात प्रचंड वाढ झाल्याने उष्णतेच्या झळा सहन कराव्या लागत आहेत. राज्यावर पाणीटंचाईचे बिकट संकट ओढवले आहे. ग्रामीण भागात हंडाभर पाण्यासाठी महिलांची पायपीट सुरू आहे. गतवर्षी अपुरा पाऊस झाल्याने सध्या मराठवाडा 'टँकरवाडा' बनला आहे. हजारो वाड्या-वस्त्यांवर टँकरने पाणीपुरवठा करावा लागत आहे. मुंबई, पुण्यासारख्या मोठ्या शहरांनाही पाणी समस्येने ग्रासले आहे. सध्या लोकसभा निवडणुकीचा माहौल सुरू असल्याने प्रशासन आणि सरकारला पाणी समस्येकडे लक्ष द्यायला वेळच नाही. निवडणुकीच्या निमित्ताने विविध पक्षांचे जाहीरनामे, वचननामे प्रसिद्ध होत आहेत त्यात पाणी प्रश्नाचा उल्लेखही नाही. राज्यात सुमारे १८०० हून अधिक गावे आणि ४३०० हून अधिक वाड्यांवर पाणीटंचाईचे भीषण संकट ओढवले आहे. जनावरेही पाण्याविना तडफडत आहेत. विदर्भ, मराठवाड्यात जनावरांचा चारा आणि पाण्याचे गंभीर संकट उभे आहे. मान्सूनचे आगमन होईपर्यंत या संकटाचा सामना कसा करायचा? हवामान विभागाने यंदा उत्तम पावसाचा अंदाज वर्तविल्याने जनतेला दिलासा मिळाला असला तरी केवळ त्या आशेवर समस्याग्रस्त दिवस ढकलणे अवघड जाणार आहे.

आम्ही जरांगे...मराठा आरक्षणाची संघर्षगाथा लवकरच

संभाजीनगर। प्रतिनिधी

नारायणा प्रोडक्शन निर्मित आणि योगेश पांडुरंग भोसले दिग्दर्शित 'आम्ही जरांगे गरजवंत मराठ्यांचा लढा' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीस येत आहे. मराठा आरक्षणासाठी संघर्ष करणारे सामाजिक कार्यकर्ते मनोज जरांगे-पाटील यांच्या ज्वलंत चळवळीला मोठ्या पडद्यावर या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नुकताच या चित्रपटाचा लोगो लाँच करण्यात आला.

'आम्ही जरांगे गरजवंत मराठ्यांचा लढा' या चित्रपटाची कथा, पटकथा आणि संवाद सुरेश पंडित यांचे असून मागील शंभर वर्षांपासून सुरू असलेल्या मराठा आरक्षणाच्या चळवळीसाठी झटलेले आणि आपल्या जीवाचे बलिदान देणारे मराठा क्रांतिवीर यांचा न पाहिलेला इतिहास पहिल्यांदाच मोठ्या पडद्यावर येत असल्याने प्रेक्षकांसाठी ही एक वेगळीच पर्वणी असणार आहे. मनोज जरांगे पाटील यांच्यासोबतच ''गरजवंत मराठ्यांचा लढा'' हा आता फक्त महाराष्ट्रापुरता मर्यादित राहिला नसून, तो जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे. त्यामुळे अर्थातच 'आम्ही जरांगे' या चित्रपटाविषयीची उत्सुकता प्रदर्शना आधीपासूनच शिगेला पोहचली आहे.

दिंद्रुड येथे पंचघोड्याच्या रथातून श्रीरामांची शोभायात्रा

दिंद्रुड । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे रामनवमीच्या औचित्याने सार्वजनिक श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने काढलेल्या शोभायात्रेत 'राम लक्ष्मण जानकी, जय बोलो हनुमान की...'च्या जयघोषात अवघी दिंद्रुड नगरी दुमदुमली. जय श्रीराम च्या गर्जनेत अनेक गाण्यांच्या तालावर तरुणाईं बेधुंद होत थिरकली. पंचघोड्याच्या सजवलेल्या रथातून अभूतपूर्व शोभायात्रा काढत शेकडो रामभक्तांसह आनंदी वातावरणात रामनवमी दिंद्रुड नगरीतून जल्लोषात साजरी करण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिंद्रुड येथे रामनवमी निमित्ताने काल बुधवार (दि१७) रोजी श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. श्रीराम मंदिरासमोर प्रभुरामचंद्राचा पारंपरिक जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी रामाच्या बाळमूर्तीस झोपाळ्यात घालून महिलांनी पाळणा गायला. राम जन्मोत्सवाच्या औचित्याने गावभर शोभायात्रा, किर्तन, ग्रंथदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. बुधवारी सकाळी हरी कीर्तन व दुपारी ठीक बारा वाजता राम प्रभूंचा जन्मोत्सव साजरा केला. यावेळी महिला अबालवृद्धांची लक्षणीय उपस्थिती होती. सायंकाळी निघालेल्या भव्य शोभायात्रेत श्रीराम भक्तांचा अलोट जनसागर लोटला तर आबालवृद्धांनी देखील उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. भगवे ध्वज आणि भगव्या रूमालांमुळे वातावरण भगवामय झाले होते. 'जय श्रीराम' च्या घोषणांनी आसमंत दणाणून गेला. मार्गातील चौकाचौकात थांबून भगवा ध्वज खेळवण्यात आला. शोभायात्रेतील श्रीरामाच्या रथाचे हजारो नागरिकांनी दर्शन घेतले. भजनी मंडळींसह नवतरुण, सामाजिक - राजकीय कार्यकर्ते, सर्वसामान्य नागरिक आशा शेकडो लोकांनी यात सहभाग घेतला. शोभायात्रा भक्तीभावाच्या वातावरणात पार पडली.

प्रत्येक गोष्टीवर संशय घेतला जाऊ शकत नाही

व्हीव्हीपीएटी प्रकरणी सुप्रीम कोर्टाची टिप्पणी

नवी दिल्ली । वृतसंस्था

व्होटर-व्हेरिफायेबल पेपर ऑडिट ट्रेल (व्हीव्हीपीएटी) स्लिपसह ईव्हीएमद्वारे टाकलेल्या प्रत्येक मताची मोजणी करण्याची मागणी करणाऱ्या याचिकांवर गुरूवारी (दि.१८ एप्रिल) सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. युक्तीवादानंतर न्यायालयाने आपला निकाल राखून ठेवला. ''प्रत्येक गोष्टीवर संशय घेतला जाऊ शकत नाही, याचिकाकर्त्यांनी 'ईव्हीएम'च्या प्रत्येक पैलूबद्दल टीका करण्याची गरज नाही,'' अशी टिप्पणीही न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठाने केली.

सुनावणीवेळी खंडपीठाने याचिकाकर्त्यांपैकी एकाचे प्रतिनिधित्व करणारे वकील प्रशांत भूषण यांना सांगितले की, ''व्हीव्हीपीएटी स्लिपसह ईव्हीएमद्वारे टाकलेल्या प्रत्येक मताची मोजणी करण्याची मागणी हा मूलभूत अधिकार आहे यावर आम्ही वाद घालत नाही; पण अति-संशयाचा उपयोग होत नाही.'' सुनावणीवेळी सॉलिसिटर जनरल (एसजी) तुषार मेहता यांनीही सांगितले की, इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीन्स (ईव्हीएम) संबंधित याचिका वारंवार दाखल केल्याने मतदारांच्या लोकशाही निवडीची चेष्टा होत आहे. निवडणुकीच्या वेळीच अशा याचिका दाखल केल्या जातात. यावर सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले की, ही याचिका निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच दाखल करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयासमोरील प्रलंबित याचिकेमुळे या याचिकेवरील सुनवणीस विलंब झाला. यासाठी याचिकाकर्त्यांना दोष देता येणार नाही. कामाच्या दबावामुळे आम्ही याचिकेवर निर्णय घेऊ शकलो नाही, परंतु निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही याचिका दाखल केली जात नाही, असे सांगत न्यायमूर्ती दत्ता यांनी तुषार मेहता यांचा युक्तीवाद खोडून काढला. याचिकाकर्त्यांपैकी एकाचे प्रतिनिधीत्व करणारे ज्येष्ठ वकील गोपाल शंकरनारायणन यांनी आपल्या युक्तीवादात सांगितले की, आम्ही भारतीय निवडणूक आयोगावर आरोप करत नसून केवळ प्रणालीबद्दलच्या शंकांवर प्रकाश टाकत आहेत.

पान १वरून...

शेतकऱ्यांची वणवण,

आहे. सध्या तेथे जनावरांसाठी एक हजार रुपये मोजून एक हजार लिटर पाणी विकत घ्यावे लागते. खानदेशात चाराटंचाई वाढली आहे. भाकड पशुधन अर्धपोटी गुजराण करते आहे. विदर्भात नागपूर विभागाच्या सहा जिल्ह्यांमध्ये गंभीर चारा टंचाई आहे. अकोला, बुलडाणा, वाशीम जिल्ह्यात चारा टंचाईचे चटके जाणवू लागले आहेत. हिंगोलीत जूनमध्ये वेळेत पाऊस न झाल्यास चारा टंचाईची समस्या गंभीर होऊ शकते. परभणीतील दुष्काळी स्थितीमुळे जिल्ह्याबाहेर चारा वाहतूक व विक्रीस बंदी लादण्यात आली आहे. राज्याच्या काही भागांत पाण्यापेक्षाही चाऱ्याची समस्या आ वासून उभी आहे. त्यामुळे चाऱ्याचे दर आवाक्याबाहेर गेले आहेत. चाऱ्याअभावी अर्धपोटी राहणारी जनावरे सांभाळणे आवाक्याबाहेर जात आहे. त्यामुळे पशुपालकांनी जनावरे विकण्यास काढली आहेत; परंतु दुर्दैवाने जनावरांच्या किमती निम्म्याने कमी करून देखील कोणीही जनावरे खरेदी करत नसल्याची स्थिती आहे.

जिल्ह्याला विकासाच्या उंचीवर

अरुण निकाळजे, सविता गोल्हार आदी उपस्थित होते. भाषणाच्या सुरुवातीला पंकजाताई मुंडे यांनी बीड त्यांनी जिल्ह्याच्या विकासाचा आराखडा मतदारांसमोर मांडतानाच माझी उमेदवारी जनतेने मान्य केली आहे, त्यामुळे विजय निश्चित असल्याचे सांगत आपण सर्वांनी आपले मत देऊन जिल्ह्याच्या विकासासाठी मला पाच वर्षे संधी द्यावी असे आवाहन केले. त्या पुढे म्हणाल्या, मंत्री पदाचा उपयोग मी जिल्ह्यात विविध योजना आणण्यासाठी केला. जलयुक्त शिवार असो की अस्मिता योजना, ऑनलाइन शिक्षक बदली प्रक्रिया, ग्रामपंचायत इमारतीसाठी दिलेला निधी असो. वेळोवेळी निधी मंजूर करून आणत विकासाचे प्रश्न मार्गी लावले आहेत. गत बावीस वर्षापासून मी राजकारणात सक्रिय आहे. आताची ही निवडणूक संसदेची आहे, त्यामुळे मतदान देताना जनतेने आपल्या हक्काचा लोकप्रतिनिधी समजून मला संधी द्यावी. तुमचे मतदान वाया जाऊ देणार नाही.

जनतेनीच माझा प्रचार हातात घेतला

विकास कामात आम्ही कधीही भेदभाव केला नाही, तो संस्कार आमचा नाही. अनेक वर्ष राजकारण करताना आम्ही सर्वांना सोबत गजरून पुढे जात आहोत. मी मंत्री असताना केलेली कामे जनता मला सांगते. सभेला होणारी गर्दी हे माझ्या कामाचे उत्तर आहे, मात्र काही जणांकडून अपप्रचार केला जातोय; परंतु पंकजा मुंडेंची निवडणूक जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेने हाती घेतली आहे हे विरोधकांनी लक्षात घ्यावे. गत निवडणुकीत पाच लाख मते घेणारे नंतर कधी जनतेसमोर आले का? असा सवालही त्यांनी केला. ही निवडणूक जिल्ह्याचे भविष्य ठरवणारी आहे. देशाच्या पंतप्रधानपदी तिसऱ्यांदा नरेंद्र मोदीजी हेच विराजमान होणार आहेत. असे सांगत त्या म्हणाल्या, पंकजा मुंडे म्हणून मला वैयक्तिक काही नकोय. जनतेबद्दल माझ्यात तळमळ आहे आणि याच तळमळीतून मी समाजकारण आणि राजकारण करते आहे. भाजपने मला त्यामुळेच दिलेली बीड लोकसभेची उमेदवारी तुम्ही सर्वांनी सार्थ ठरवावी, एवढीच माझी अपेक्षा असल्याचेही त्या म्हणाल्या.

जिल्हयाला विकासाच्या उंचीवर नेणार

तुमच्या प्रत्येक मताचा उपयोग मी बीड जिल्हा विकसित करून दाखवण्यासाठी करेल. म्हणून या निवडणुकीत विकास हेच व्हिजन पुढे नेण्यासाठी माझ्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा. भविष्यात जिल्ह्यासाठी खूप काही करायचे आहे असा विश्वासही पंकजाताईंनी उपस्थितांना दिला.

बुध्दीभेद करणाऱ्यांना थारा देऊ नका - आ.सुरेश धस

सभेत आमदार सुरेश धस यांनी विरोधकांचा खास शब्दात समाचार घेतला. ते म्हणाले,अब की बार चारसो पारचा नारा भाजपाने दिल्यानंतर आपले विरोधक भाजप संविधान बदलणार असल्याचा अपप्रचार करून जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचे काम करू लागले आहेत मात्र बीड जिल्ह्यातील जनता अशा लोकांना चांगले ओळखते. ही जनता विरोधकांना थारा देणार नाही. भाजप हा समाजातील शेवटच्या वंचित घटकाला न्याय देण्याचे काम करत असलेला पक्ष आहे. काँग्रेसने पाच सो पारचा नारा द्यावा आमचे काहीच म्हणणे नाही पण आम्ही चारसो पारचा नारा दिल्यानंतर त्यांना पोटशुळ का उठत आहे, असा खडा सवाल ही आमदार सुरेश धस यांनी केला.

इंडिया आघाडीच्या पारड्यात बीडचे एक मत

पक्षाचे निरीक्षक जीवनराव गोरे, माजी मंत्री अशोकराव पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्रजी पवार पक्ष.आणि इंडिया आघाडीचे लोकसभेचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेसाहेब देशमुख, विधानसभा प्रमुख सुरेश तात्या पाटील, जिल्हा उपाध्यक्ष राहुल सोनवणे, माजी आमदार पृथ्वीराज साठे, महिला आघाडीच्या पांडूळेताई आदित्य दादा पाटील, पशुपतीनाथ दांगट, डॉ. नरेंद्र काळे, माजी नगराध्यक्ष कबिरोद्दिन इनामदार, दलील इनामदार, श्रीधर बाबा भवर हे उपस्थित होते. यावेळी रजनीताई पाटील पुढे बोलताना म्हणाल्या कि ; कार्यकर्त्यांनी एकदिलाने आणि एकविचाराने कमंक्रून बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे. असे आवाहन केले. तसेच या देशात जर पुन्हा भाजपचे सरकार आले तर कदापि देशात निवडणूक होणार नाहीत. या देशाची वाटचाल हुकूमशाहीकडे होईल. याचा सर्वांनी विचार करून पुरोगामी विचाराच्या उमेदवाराला निवडून देण्यासाठी एकत्रितपणे व समन्वय ठेवून काम करण्याची आवाहनहि त्यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले. यावेळी जीवनराव गोरे यांनी देखील इंडिया आघाडीची मूठ आवळून जिल्ह्यातून बजरंग सोनवणे यांना निवडून आणण्यासाठी बूथ कमिट्याची रचना करून मतदारांना मतदान केंद्रा पर्यंत घेवून जात मतदान करून घेण्याचे नियोजन करण्याचा सल्ला दिला.

ताईंचे आशीर्वाद माझ्यासाठी विजय प्रशस्त करणारे-बजरंग सोनवणे

रजनीताईंकडे पाच राज्यांची जबाबदारी आहे त्यातून त्यांनी वेळ काढला व येथे येऊन त्यांनी मला आशीर्वाद दिले ते माझ्यासाठी मोलाचे आहेत त्यांच्या साथीमुळे माझा विजयाचा मार्ग प्रशस्त झाला आहे .आता राजकीय विश्लेषकांसाठी कुठल्याही किंतु परंतु ला जागा नसल्याचे बजरंग सोनवणे यांनी नमूद करत ताईंचे आभार मानले तसेच भविष्यात योग्य समन्वय ठेऊनच काम करू व कुठलीही अडचण येणार नाही याची दक्षता घेऊ असे आश्वासन त्यांनी दिले.

नेत्यांनी जनतेचे मन ओळखण्यात शहाणपण-अशोक पाटील

पूर्वी नेत्याच्या खिशात जनता असायची त्यामुळे नेते सांगतील तेच ते ऐकत असत पण आता या निवडणुकीत परिस्थिती वेगळी आहे आता लोकांचे म्हणणे समजून घेण्यात हुषारी असल्याचे मत माजी मंत्री अशोक पाटील यांनी यावेळी व्यक्त केले.

आज पहिल्या

आयोगाने कठोर परिश्रम घेतल्याचेही म्हटले. पहिल्या टप्प्यात १९ एप्रिल रोजी देशातील १०२ लोकसभा मतदारसंघ (जनरल- ७३; एसटी- ११; एससी-१८) आणि २१ राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील ९२ विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. अरुणाचल आणि सिक्कीममध्ये विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी होत आहेत. यामध्ये सर्व टप्प्यांच्या तुलनेत संसदीय मतदारसंघांची संख्या सर्वाधिक आहे. मतदान सकाळी ७ वाजता सुरू होऊन सायंकाळी ६ वाजता संपेल. निवडणूक आयोगाच्या माहितीनुसार, १.८७ लाख मतदान केंद्रे तयार असून १८ लाखांहून अधिक मतदान अधिकारी सज्ज आहेत. १६.६३ कोटींहून अधिक मतदार १६२५ उमेदवारांचे भवितव्य ठरवतील. मतदारांमध्ये ८.४ कोटी पुरुष, ८.२३ कोटी महिला आणि ११,३७१ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. पहिल्या टप्प्यात १६२५ उमेदवार (पुरुष १४९१; महिला १३४) निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मतदान आणि सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या वाहतुकीसाठी ४१ हेलिकॉप्टर, ८४ विशेष गाड्या आणि सुमारे १ लाख वाहने तैनात करण्यात आली आहेत. निवडणुका शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी निवडणूक आयोगाने अनेक निर्णायक पावले उचलली आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी मतदान केंद्रांवर पुरेसा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे.

डीवायएसपी धीरजकुमार बच्चू यांनी राम

पोलिस अधिकारी धीरज कुमार बच्चे यांनी आरारावी करत मिरवणूक थांबवली होती या संदर्भात संभाजी महाराज चौकातील एका हॉटेलमध्ये गुरूवार रोजीपत्रकार परिषद आयोजन करण्यात आले होते. यावेळी पुढे बोलताना डॉ. शेटे म्हणाले की, इतिहासात कधीही संयोजन समितीला वारंवार धारेवर धरून तसेच इन्स्ट्रक्शन देण्याच्या नावाखाली धमकी वजा सूचना देण्याचे प्रकार कुठल्याही इतर कार्यक्रमाच्या संयोजन समितीला या अगोदर दिल्याचे ऐकिवात नव्हते परंतु अशी कोणती शक्ती पाठीमागे घेऊन धीरजकुमार बच्चू हे राम जन्मोत्सव समितीच्या सभासदांना धमकी वजा सूचना मागील चार दिवसांपासून करत होते हे एक न उलगडणारे कोडं असून धीरज कुमार बच्चू यांच्या राम जन्मोत्सव मिरवणुकी संदर्भातील भूमिकेमुळे हिंदू विरुद्ध पोलीस असा काही प्रकार त्यांना घडवून आणायचा होता का असाही सवाल पत्रकार परिषदेद्वारे डॉक्टर शेटे यांनी उपस्थित करत पोलीसांना मान खाली घालायला लावणाऱ्या अशा अधिकाऱ्याने सन्मानाने इथुन निघुन जावे अन्यथा घालवावे लागेल असा गर्भित इशारा दिला आहे. यावेळी दैनिक कार्यारंभ चे संपादक शिवाजीराव रांजवन, अमरनाथ खुर्पे,अभय कोकड, सौरभ जाधव, आर्दीची उपस्थिती होती. बुधवारी अत्यंत शांततेत सायंकाळी पाच वाजता प्रभू श्रीराम जन्मोत्सव मिरवणूक येथील झेंडा चौक परिसरातून विधिवत श्रीफळ अर्पण करून निघाली यावेळी धीरज कुमार बच्चू यांनी कुठलेही कारण नसताना डीजे चालकास मारहाण केली त्यामुळे वातावरण चांगलेच तापले होते परंतु जेष्ठ मंडळींनी हस्तक्षेप करून मिरवणूक पूर्ववत करण्याचा प्रयत्न केला असता बच्चू यांनी त्यांनाही अपमानास्पद वागणूक देत दांडकशाहीचा परिचय दिला. यातून माजलगाव शहरात काही काळ कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो की काय असे वाटत होते पोलीस अधिकाऱ्याच्या अशा वागण्यामुळे माजलगाव मध्ये दंगल होता होता राहिली इतकी गंभीर परिस्थिती निर्माण झाली होती. दरम्यान डी वाय एस पी बच्चू यांचा यामागे कुठलातरी दुष्ट हेतू असल्याचे शेटे यांनी केलेल्या आरोपांमुळे दिसुन येत असुन माजलगाव शहर आणि ग्रामीण पोलिसांना तर चक्क एका विशिष्ट समाजाच्या लोकांनी घेरले की काय? आणि त्यांच्या म्हणण्यावरून किंवा ऐकिवात जाऊन पोलीस वागत आहेत की काय ? असाही सवाल या निमित्ताने उपस्थित होत असून वरिष्ठ अधिकाऱ्यांनी माजलगाव शहर आणि ग्रामीण पोलीस स्टेशनचे सीसीटीव्ही ची तपासणी करून वारंवार पोलीस स्टेशन भोवती फिरणाऱ्या या लोकांवर कारवाई करावी अशी देखील मागणी पुढे येऊ लागली आहे.

आता किराणा दुकानातही मिळणार

औषधे जी डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विकली जाऊ शकतात. अमेरिका, ब्रिटन आणि ऑस्ट्रेलियासारख्या देशांमध्ये हे धोरण आधीपासूनच लागू करण्यात आलेले आहे. आता भारतात सुद्धा याची अंमलबजावणी करण्याची तयारी सुरू झाली आहे. समिती यासाठी काम करत आहे. यासंबंधी समितीला आतापर्यंत अनेक सूचना मिळाल्या आहेत. मात्र, अधिकृतरित्या अद्याप काही सांगण्यात आले नाही. रिपोर्टनुसार, ग्रामीण भागाला डोळ्यासमोर ठेवून सरकार हे धोरण आणण्याची तयारी करत आहे. ग्रामीण भागात डॉक्टरांची कमतरता आहे. याशिवाय ग्रामीण भागात मेडिकल स्टोअर्सही देखील कमी प्रमाणात उपलब्ध आहेत. अशा स्थितीत अनेक वेळा लोकांना आवश्यक औषधेही मिळत नाहीत. अनेक प्रकरणांमध्ये आवश्यक औषधे वेळेवर मिळाली नाहीत, तर रुग्णांची स्थिती अधिकच गंभीर होते. यासाठी समितीद्वारे ओटीसीबाबत सूचना दिली आहे.

समितीमडून मसुदा तयार

या वर्षी फेब्रुवारीमध्ये आरोग्य सेवा महासंचालक अतुल गोयल यांनी यासंबधीची तज्ज्ञांची समिती स्थापन केली होती. या समितीकडे भारताचे ओटीसी औषध धोरण तयार करण्याचे काम सोपवण्यात आले होते. सुत्रांच्या म्हणण्यानुसार, समितीने एक मसुदाही सादर केला आहे. यामध्ये अशा औषधांची लिस्ट सुद्धा देण्यात आली आहे, जी ओव्हर द काउंटरवर विकला येऊ शकेल. दरम्यान, भारतात अद्याप असा कोणताही नियम नाही. जर एखादे औषध केवळ प्रिस्क्रिप्शनसाठी सांगितले जात नसेल तर ते ओटीसी मानले जाते, जरी यासंबंधी कोणताही निश्चित नियम नाही. याला नियमांच्या कक्षेत आणून अत्यावश्यक औषधांची उपलब्धता वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या

आता पुन्हा एकदा असाच प्रकार उघडकीस आला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसवर बॅनर लावून बेकायदेशीरपणे शिवसेना पक्षाची जाहीरातबाजी करून आदर्श आचारसंहितेचा भंग केला आहे, त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेच्या सर्वांची उमेदवारी रद्द करा, अशी मागणी प्रदेश काँग्रेसचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी केली. निवडणूक आयोगाचे मुख्याधिकारी यांना पाठवलेल्या पत्रात अतुल लोंढे म्हणतात की, निवडणूक आयोगाच्या पत्र क्र. ४३७/६//२०१५- दि २९.१२.२०१५ नुसार, निवडणूक प्रचारासाठी सरकारी आणि सार्वजनिक उपक्रमांच्या मालमत्तांच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे, अशा आशयाचे पत्र सर्व राज्यांचे कॅबिनेट सचिव, मुख्य सचिव आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना उद्देशून पाठवलेले आहे. बंदी असतानाही एसटीच्या अधिकाऱ्यांनी १००० हून अधिक बसेस शिवसेना उमेदवाराच्या निवडणूक प्रचारासाठी अवामंडळाच्या या बसेसवर शिवसेना बॅनर लावून निवडणूक प्रचार करत आहे. या बॅनरवर पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांचे फोटो आणि शिवसेनेचे धनुष्यबाण चिन्ह स्पष्टपणे दाखवण्यात आले आहेत. एसटी महामंडळाच्या अधिकाऱ्यांचे हे कृत्य केवळ आचारसंहितेचे स्पष्ट उल्लंघन करत नाही तर निवडणूक प्रक्रियेच्या निष्पक्षता आणि अखंडतेला बाधा आणणारे आहे. आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांवरही कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

स्थानिक नेत्यांपेक्षाक्षा

यांन १ लाख ७२ हजार ४०९ मते तर केशरकाकु यांना २ लाख ६० हजार ३५ मते मिळाल्याने त्यांचा विजय झाला. पुढे १९९६ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने मोठे यश मिळवले. यावेळी गोपीनाथ मुंडे यांनी माजी मंत्री अशोक पाटील यांच्या पत्नी रजनी पाटील हा नविन चेहरा लोकसभा निवडणुकीत उतरवला. यावेळी त्यांना २ लाख ७९ हजार ९९५ मते मिळाली तर केशरकाकु यांना २ लाख २२ हजार ५३५ मते मिळाली. १९९८ साली झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपकडून निवडून आलेल्या रजनी पाटील यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. व त्यांचे पती अशोक पाटील यांनी निवडणुक लढवली. यावेळी गोपीनाथ मुंडे यांनी जयसिंगराव गायकवाड यांना उमेदवारी दिली. यावेळी अशोक पाटील यांचा पराभव झाला. शरद पवार यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून राज्यात राष्ट्रवादी काँग्रेस स्थापन केली. पुढे १९९९ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी राधाकृष्ण होके पाटील यांना बीडमधून उमेदवारी दिली. या निवडणुकीनंतर काँग्रेसचा असलेला बाल्लेकिल्ला पवारांचा गड बनला. बीड जिल्ह्यात काँग्रेस लयास गेली. या निवडणुकीत भाजपचे जयसिंगराव गायकवाड पुन्हा विजयी झाले. या दोन निवडणुकीत गायकवाड यांना अनुक्रमे ३ लाख ३०७ आणि ३ लाख ३२ हजार ९४६ मते मिळाली. ही मते गोपीनाथ मुंडे यांना मानणारी होती. पुढे गायकवाड यांनी भाजपला रामराम करीत शरद पवारांची घड्याळ हाती बांधली. २००४ च्या निवडणुकीत पवारांचे पारडे जड झाले. जयसिंगराव गायकवाड यांना ४ लाख २५ हजार ५१ मते मिळाली. तर माजलगाव तालुक्याचे नेते प्रकाश सोळंके यांना मुंडे यांनी भाजपची उमेदवारी दिल्याने त्यांनाही ३ लाख ७७ हजार ६३९ मते मिळाली. १९९१ ते १९९८ या दरम्यान झालेल्या निवडणुकांमध्ये गोपीनाथ मुंडे आणि काँग्रेस असाच सामना पहायला मिळाला. त्यानंतर १९९९ च्या लोकसभा निवडणुकीपासून आजपर्यंत बीड जिल्ह्यात मुंडे विरुध्द पवार अशीच पडद्याआडून लढत झाली. या पाचपैकी चार लोकसभा निवडणुकीवर मुंडे यांचा प्रभाव राहिला. जयसिंगराव गायकवाड हे २००४ साली राष्ट्रवादी काँग्रेसचे एकमेव खासदार राहिले आहेत. या दरम्यान पवार आणि मुंडे यांनी दिलेल्या कोणत्याही उमेदवाराच्या पाठीशी बीड जिल्ह्यातील मतदार राहिला आहे, मग स्थानिक नेते असो वा नसो. गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतरही त्यांच्या विचारधारेशी जोडलेला मतदार अजूनही कायम टिकून आहे. तर पवार यांचा करिश्मा प्रत्येक वेळी निवडणुकांत दिसून आला आहे. २०२४ च्या निवडणुकीत मुंडे आणि पवार यांच्यापैकी कोणाच्या विचारधारेला मतदार पसंती देतात हे काही दिवसाने कळणारच आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

बीड : आहेर वडगाव येथे रोहीटे परीवार व कडवकर परीवार यांच्या विवाह सोहळ्यास शिवसेना जिल्हाप्रमूख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहून वधू वर यांना मनपूर्वक शुभेच्छा दिल्या याप्रसंगी उपस्थित बीड तालुका प्रमुख गोरख आण्णा सिंघण,बाजार समितीचे माजी सभापती आरूण नाना डाके,माजी सभापती दिनकरराव कदम, नवनाथ आण्णा शिराळे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, चेअरमन नानासाहेब काकडे पाटील, अशोक खरसाडे, आत्माराम खरसाडे, युवा नेते रमण नवले सह सहकारी उपस्थित होते.

श्रीराम जन्मोत्सवा निमित्त मिरवणूक उत्साहात

रामभक्त युवकांचा मोठया संख्येने सहभाग; श्रीरामाच्या भव्य मुर्तीचे हजारो भाविकांनी घेतले दर्शन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरात रामजन्मोत्सवा निमित्याने भव्य मिरवणुक मोठ्या उत्साहात काढण्यात आली मिरवणुकीत हजारो रामभक्त युवकांचा सहभाग होता या निमित्ताने शहरात भगवे ध्वज,पताका, विद्युत रोषणाई करण्यात आली होती.

शहरातील रामभक्तांच्या वतीने शहरातून भव्य मिरवणुक काढण्यात आली पाटील चौक भागातील राममंदीर येथून या मिरवणुकीस प्रारंभ होऊन शहरातील विविध महत्वपुर्ण चौक,मुख्य रस्ते आदी ठिकाणाहून या मिरवणूकीने मार्गक्रमण केले. यावेळी भव्य अशा श्रीरामांच्या भव्य आकर्षक मुर्तीचे भक्तांनी दर्शन घेतले. या मिरवणुकीसाठी पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख

बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

मिरवणुकीने शहरातील वातावरण भक्तीमय

अंबाजोगाईत राम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त पारंपारीक राम मंदिरात जन्मोत्सव तसेच पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला या निमित्याने शहराच्या धार्मिक वैभवात भर पडली तसेच वातावरण भक्तीमय झाले विशेष म्हणजे शहरातून निघालेली भव्य मिरवणूक शहराचे प्रमुख आकर्षण होती, प्रभु रामचंद्रांच्या मुर्तीचे विधिवत पुजन करून या मिरवणूक सोहळ्याला प्रारंभ झाला. गेल्या काही वर्षापासुन होत असलेल्या या मिरवणूकीने अंबाजोगाईच्या धार्मिक तसेच सांस्कृतिक वैभवात भर घातली शहराला धार्मिक वारसा असून मिरवणूकीच्या निमित्ताने यात अधिक भर घातली गेली आहे.

भगवे ध्वज घेतलेले बाल रामभक्त ठरले आकर्षण

श्रीराम जन्मोत्सव सोहळ्याच्या निमित्ताने भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले असता मोठया संख्येने बाल राम भक्त भगवे ध्वज घेवून मिरवणूकीत समुहाने सामील झाले होते.विविध रामगीतांच्या गाण्यावर अभिनय आणि नृत्य करून आपल्या हातातील ध्वज हवेत उंचवून नागरिकांचे लक्ष वेधत होते. मिरवणुकी दरम्यान ठिकठिकाणच्या रस्त्यावर रांगोळ्या काढून भगव्या पताका, ध्वज,फलक,लावुन मिरवणुकीचे शहरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

नगरपरिषद बीड यांनी वर्ग केलेल्या कामाची सखोल चौकशीची मागणी

बीड । प्रतिनिधी

नगरपरिषद बीड यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग बीड यांना कोट्यावधी रुपयांचे कामे वर्ग केले होते. त्यानंतर सदरील कामे पुन्हा नगर परिषद बीड यांच्याकडे वर्ग करण्याचे प्रक्रिया सुरू होती ती पुन्हा रद्द झाली सदरील कामास जिल्हाधिकारी बीड यांनी प्रशासकीय मान्यता दिली परंतु उपअभियंता बोराडे यांनी कामे न करता मोजमाप पुस्तिका बनवत कामे न करता बिल उचलले आहेत. सदरील कामे पूर्ण केली आहेत किंवा नाही याची चौकशी करणे करिता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांनी समिती गठीत करावी.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मागितली असता देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे. उपअभियंता बोराडे यांचेकडे उपविभाग बीड यांचेकडे पदभार आल्यापासून प्रचंड प्रमाणात अनियमितता झाली आहे. तसेच एकमेकमाविषयी कार्यालयीन गोपनीय माहिती त्रयस्थ व्यक्तिस पुरवण्यात येत असल्याचे दिसून आले.

वादग्रस्त उपअभियंता बोराडे यांनी कागदोपत्री कामे पूर्ण केल्याचा सरवदे यांचा आरोप

कार्यकारी अभियंता तोंडे यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष

सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे इंजि.ठाकूर गेल्या ५ ते ७ वर्षांपासून बीडमध्येच काम करत असून ते या ठिकाणचे रहिवासी असताना निवडणुकीमध्ये त्यांची बदली होणे अपेक्षित होते, तसेच त्यांच्या कार्यकाळामध्ये असंख्य बोगस कामे झाले आहेत याची सखोल चौकशी करण्यासाठी कार्यकारी अभियंता तोंडे यांच्याकडे तक्रार दिली असतात कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे. आदर्श आचारसंहिता संपल्यानंतर आंदोलन करत पाठपुरावा करणार आहे.

अजय सरवदे
युवा नेते वंचित बहुजन आघाडी बीड

चिंचगव्हाण येथे प्रमाणित गतिरोधक व सिग्नल बसवा –ॲड.अमोल डोंगरे

उपविभागीय अधिकारी माजलगाव यांचेकडे मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्या पासुन १ कि.मी.अंतरावर राष्ट्रीय महामार्ग क्र.६१वर गढी – गेवराई रोड वर वसलेलं चिंचगव्हाण गाव हे लोकसंख्या १० ते १२ हजार असलेलं गाव आहे. या राष्ट्रीय महामार्गावर वसलेल्या चिंचगव्हाण गावाला प्रमुख दोन मार्ग आहेत. एक मार्ग पुर्व दिशेने जाणारा देवखेडा मार्ग हा मार्ग पुढे पुनंदगाव,देवखेडा,नागझरी या प्रमुख गावांना जोडला आहे व उत्तरेस ब्रह्मगाव, खानापूर, रेणापूर या गावांसह माजलगाव शहराला जोडला जातो.

हा रस्ता चौवीस तास गजबजलेला असुन या गावातील नागरिक, अबालवृद्ध, विद्यार्थी, महिला पादचारी व दुचाकी स्वार यांना दोन्ही बाजूने रस्ता ओलांडताना जीव धोक्यात टाकून रस्ता ओलांडवा लागतो या राष्ट्रीय महामार्गावरून भरधाव वेगाने वाहणा–या वाहनांमुळे आजपर्यंत अनेकांना आपला जिव गमवावे लागले तर काहींना अपंगत्व आले आहे.

तसेच गावच्या पश्चिमेस असलेला व राष्ट्रीय महामार्गाला जोडलेला मुख्य रस्त्यावर या प्राधिकरणाने दुभाजक घालून रस्ता बंद केल्याने गावातील खालच्या भागात राहणाऱ्या नागरिकांना गावाला ओळसा घालून देवखेडा मार्गावरून यावे लागते त्यामुळे चिंचगव्हाण गावाच्या पश्चिमेस रस्त्यावरील दुभाजक हटवून सदर रस्ता खुला करून द्यावा व तात्काळ राष्ट्रीय महामार्ग क्र.६१ ला जोडणारा चिंचगव्हाण मार्गे देवखेडा रस्त्यावर प्रमाणित गतिरोधक व सिग्नल बसविण्यात यावा अशी मागणी उपविभागीय अधिकारी माजलगाव यांना निवेदनाद्वारे बहुजन समाज पार्टी चे बीड जिल्हाध्यक्ष अड.अमोल डोंगरे यांनी केली अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला.

आशिष लोमटेचे नेत्रदीपक यश ; एमबीबीएस होण्याचा मिळवला बहुमान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इच्छाशक्ती व प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याची तयारी असेल तर जगात कोणतीच गोष्ट अशक्य नाही. याची प्रचिती म्हणजे येथील गुणवंत विद्यार्थी डॉ.आशिष अनिता बालासाहेब लोमटे हा होय. एमबीबीएस ही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी प्राप्त करून त्याने कुटुंबाचे नांव उंचावले आहे.

एमबीबीएस – २०१८ च्या बॅचचा दिक्षांत समारंभ नुकताच अंबाजोगाई येथे आर्यवीर लॉन्स, केज रोड येथे आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने (मुंबई) आणि डॉ.अश्विनीकुमार तुपकिरे (संचालक, हेडगेवार हॉस्पिटल, छत्रपती संभाजीनगर.) हे होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी रामानंद तीर्थ शासकीय ग्रामीण रूग्णालय व महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे हे होते. यावेळी उपअधिष्ठाता डॉ.अरविंद बगाटे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. या दिक्षांत समारंभात डॉ.अश्विनीकुमार तुपकिरे यांच्या हस्ते आणि सुप्रसिद्ध अस्थिरोग तज्ज्ञ डॉ.प्रकाश

चव्हाण (नांदेड), सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ज्ञ डॉ.दिपक कटारे (अंबाजोगाई) यांच्यासह मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ.आशिष अनिता बालासाहेब लोमटे याने एमबीबीएस ही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी स्विकारली. हा अभ्यासक्रम साडे पाच वर्ष कालावधीचा आहे. त्यानंतर इंटर्नशिप एक वर्ष असते. आशिष हा अंबाजोगाई येथील तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.बालासाहेब लोमटे यांचा मुलगा आहे. यापूर्वी डॉ.आशिषची बहिण डॉ.ऐश्वर्या हिने ही एमबीबीएस ही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी प्राप्त केली आहे. आशिषला उपअधिष्ठाता डॉ.सिध्देश्वर बिराजदार, अधिक्षक डॉ.राकेश जाधव यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे. डॉ.आशिषचे प्राथमिक शिक्षण हे दुर्गम आदिवासी भागात होली क्रॉस शाळा, चिखलदरा (जि.अमरावती) येथे तर माध्यमिक शिक्षण योगेश्वरी नूतन विद्यालय, अंबाजोगाई येथे झाले आहे. तसेच बारावीचे शिक्षण छत्रपती राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे झाले. स्वामी रामानंद तिर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथून त्याने एमबीबीएस ही पदवी घेतली आहे. आता स्त्रीरोग तज्ज्ञ या विषयात अश्विनी वैद्यकीय महाविद्यालय, सोलापूर येथे पुढील उच्चशिक्षण घेत आहे. डॉ.आशिषने सुरूवाती पासूनच वाचन व खेळ हे छंद जोपासले आहेत. एमबीबीएस होण्याचा बहुमान प्राप्त केल्याबद्दल लोमटे परिवार, विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक, मित्र, पत्रकार यांच्याकडून डॉ.आशिषचे कौतुक होत आहे.

गोरगरीब, गरजू समाज बांधवांची रूग्णसेवा करणार

माझ्या यशात माझे आई – वडील, बहिण व प्राथमिक शाळेपासून आतापर्यंतच्या सर्व गुरूजनांचे मोठे योगदान आहे. वडील डॉ.बालासाहेब लोमटे हे तालुका आरोग्य अधिकारी म्हणून अंबाजोगाई येथे कार्यरत आहेत. तर आई सौ.अनिता यांनी घरकाम सांभाळत माझ्या अभ्यासाकडे काळजीपूर्वक लक्ष दिले. बालमित्र सुजित रामराव दिक्षित याचे ही सहकार्य लाभले. यापुढे गोरगरीब, गरजू समाज बांधवांची रूग्णसेवा करण्याचा माझा मानस आहे. समाजबांधवांना शिक्षणाचे महत्व पटवून देण्यासाठी मी कटिबद्ध असणार आहे.

– डॉ.आशिष लोमटे (अंबाजोगाई)

प्रसाद हरिभाऊ नाईकनवरे नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत पात्र

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील स्पर्धा परीक्षा व गणित विषयासाठी प्रसिध्द असलेल्या डायमंड कोचिंग क्लासेसने यावर्षीही यशाची परंपरा कायम ठेवत नवोदय परीक्षेत यश मिळविले आहे.

क्लासेस चा विद्यार्थी कु. प्रसाद हरिभाऊ नाईकनवरे याची जवाहरलाल नवोदय विद्यालय, गढी येथे प्रवेशासाठी निवड झाली आहे..विद्यार्थ्याच्या या यशाने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

त्याने मिळविलेल्या यशाबद्दल त्याचा क्लासेस चे संचालक राहुल सोळसकर सर व श्रीराम नागरगोजे सर यांनी डायमंड कोचिंग क्लासेस

च्या वतीने सत्कार करून पुढील कार्यास खूप खूप शुभेच्छा अनेक पालक उपस्तीत होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीराम नागरगोजे सर यांनी केले तर आभार क्लासेस चे संचालक राहूल सोळसकर सर यांनी केले.यावेळी उपस्थित सर्व विद्यार्थी होते.

सुफियान मणियार, समीर सरकार आदी नवतरुणांच्या मागणीला पाटोद्यातून पाठिंबा

उमेदवारांनी मुस्लिम समाजाविषयी आपली भूमिका स्पष्ट करावी:–शेख जावेद,मोसिन भाऊ

पाटोदा । प्रतिनिधी

मुस्लिम समाजाचा सर्वच राजकीय पक्ष आप आपल्या पद्धतीने गृहीत धरून प्रचार करत असले तरी मुस्लिम समाजाचे प्रश्न आजही अनुतर्णीय आहेत जातीय समीकरणात मुस्लिम समाज हा सामाजिक विघटनातून बाहेर फेकलेला असुन सद्य: स्थित राजकीय गणितात समाजाची नोंद ही बेदखल असल्याची खंत नवतरुणांना जानवत असल्याने बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुस्लीम समाजातील सामाजिक चळवळीतील अग्रेसर असणारे सुफियान मणियार, समीर सरकार,इम्रान शहा आदी नवतरुणांनी लोकसभा निवडणुकीला सामोरे जाणाऱ्या प्रमुख पक्षाच्या उमेदवारांनी मुस्लिम समाजाच्या मुख्य आणि महत्वपूर्ण प्रश्नांवर , समस्यांवर , व विकासात्मक धोरणांवर आपली भूमिका स्पष्ट करावी अशी मागणी करत मुस्लिम समाजाचा जाहीरनामा तयार करून बीड लोकसभेच्या सर्व पक्षीय उमेदवारांना भेटुन मुस्लिम समाजा विषयी आपली भूमिका स्पष्ट करण्या संदर्भात मागणी करणार आहेत. याबाबतीत बीड

जिल्ह्यातुन या तरूणांच्या निर्णयाचे स्वागत करत पाठिंबा दर्शविण्यात येत आहे. कारण की बीड लोकसभा मतदारसंघात ३ लाख पेक्षा जास्त मुस्लिम मतदार असुन कोणत्याही विजयी उमेदवारांना हे मतदान निर्णायक ठरणारे असले तरी प्रमुख पक्षाच्या उमेदवारांकडून मुस्लिम समाजाच्या प्रमूख समस्या व प्रश्नावर कानडोळा करणे सुरू आहे . उमेदवारांनी मुस्लिम आरक्षण , शिक्षण व संरक्षण विकासात्मक धोरणावर आपली भूमिका स्पष्ट करावी याबद्दल नवतरुणांनी घेतलेली भुमिका योग्य असुन पाटोदा तालुक्यातुनही मुस्लिम समाजाचा पाठिंबा देण्यात आला असल्याचे समाजिक कार्यकर्ते शेख जावेद,मोसिन भाऊ यांनी जाहीर केले आहे.तरी सर्व पक्षीय उमेदवारांनी मुस्लिम समाजाविषयी आपली भुमिका स्पष्ट करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

पान ६ वरून...

पंकजाताई किती दिवस रेल्वेचे गाजर

त्यांच्यासाठी मी माझी बीड लोकसभेसाठी उमेदवारी दाखल करणार आहे,अशी माहिती राजेंद्र होके पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली

या पत्रकार परिषदेस रामचंद्र डोईजड प्रा.जीवन नखाते,ओम कुरे,अशोक जगदाळे सर यांच्यासह इतरांची उपस्थिती होती.पुढे बोलताना राजेंद्र होके म्हणाले, मराठा समाज म्हणजे काही पक्ष मराठा समाजाला स्वतःची मक्तेदारी समजत आहेत. राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी लोकसभा आली की बीड जिल्ह्यात दोन जातीत भांडणं लावून देण्याचा प्रयोग गेल्या तीन ते चार निवडणुकीत केला आहे.पण आता मराठा समाज हुशार झालेला आहे.शरद पवारांना बीड लोकसभेची जागा खरंच जिंकायची असेल तर त्यांनी बीडमधून ओबीसी उमेदवार का दिली नाही? त्यांनी ओबीसी उमेदवार द्यावा म्हणून मागच्या निवडणुकीत मी त्यांना प्रत्यक्ष भेटून मागणी केली होती. पण नाही.केवळ जाती जातीत भांडणं लावून इथे दोघांमध्ये टक्कर लावून द्यायची, विकासाच्या कुठल्याच मुद्यावर निवडणूक न लढवता त्यांनी एवढाच उद्योग जिल्ह्यात केला.त्यामुळे शरद पवार साहेबांनी मराठा समाजाला आपली मक्तेदारी समजू नये.असेही होके पाटील म्हणाले.शरद पवारांनी ज्या बजरंग सोनवणेंना उमेदवारी दिली त्या बजरंग सोनवणेला माजलगावकरांनी लाखभर मते दिली होती.मग मागच्या पाच वर्षात माजलगावकरांच्या सुख दुःखात यायचे त्यांचे काम नव्हते का? साधे ते धारूरच्या घाटाच्या खाली देखील उतरले नाहीत.मग का म्हणून त्यांना माजलगावकरांनी कशामुळे जवळ करावे?मागच्या दोन वर्षापुर्वी त्यांनी घाटाच्या खालचे साधे उसाचे एक टिपूरू देखील उचलले नव्हते,मग ते शेतकरी ह्याचे सगे सोयरे नव्हते का? आज मतदानालाच बरी सगे सोयऱ्यांची आठवण झाली असाही आरोप राजेंद्र होके यांनी केला.

रेल्वेचं गाजर किती दिवस दाखवणार?

आमच्या आजोबांच्या लहानपणापासून बीड जिल्ह्यात रेल्वे यायली आहे.आता आमची जायची वेळ झाली पण अजून आम्हाला रेल्वे दिसली नाही.कोण जर म्हणत असेल आम्ही रेल्वे आणली तर ह्या निव्वळ भुलथापा आहेत.खा.प्रीतमताई मुंडेंना पावणे दोन लाख मताने जिल्ह्यातील मतदारांनी निवडून दिले.स्वतः मोदी म्हणाले होते बीडला रेल्वे आणणार. काय झाले मग? देवेंद्र फडणवीसांची भाजपा असो की शरद पवारांची राष्ट्रवादी दोन जातीत भांडण लावण्याचे काम त्यांनी बीड जिल्ह्यात केले. त्यामुळे या दोन्ही पक्षांना मत न देता तिसरा पर्याय म्हणून मी उभा राहणार आहे.रात्री बेरात्री सुखादुःखात हा राजेंद्र होके तुमच्या मदतीला येतो.त्यामुळे जो तुमच्या कामाला येतो त्याला तुम्ही मतदान करा,असे आवाहन देखील राजेंद्र होके यांनी मतदारांना केले.

कोट्यावधीचा खर्च करूनही सहाय्यकारी संस्थांकडून ग्रामपंचायती मॉडेल होत नाहीत

सात दिवसात काम पूर्ण करा –उपमुकाअ. सुधाकर मुंडे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील १६९ ग्रामपंचायतींना घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाचे काम पूर्ण करण्यासाठी निधी वितरित करण्यात आला .मात्र या प्रकल्पाला आलेल्या एकूण खर्चाच्या पाच टक्के रक्कम सहाय्यकारी संस्थांना देऊनही त्यांच्याकडून एकही गाव मॉडेल होत नाही .याबाबत राज्यस्तरावरून विचारणा करण्यात आली आहे. यासंदर्भात जिल्हा पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी एक पत्र काढून जिल्हाभरात काम करणाऱ्या आठ संस्थांना सात दिवसात गावे मॉडेल करण्याची तंबी दिली आहे.

बीड जिल्ह्यातील ग्रामीण विकास मंडळ बनसारोळा, परिवर्तन सेवाभावी संस्था सुरळेगाव, जयदत्त शिक्षण कृषी जलविकास प्रतिष्ठान किन्ही,अमित सेवाभावी संस्था पोखरा, बळीराजा बहु सेवाभावी संस्था बीड, माऊली शिक्षण प्रसारक मंडळ सोनगाव ,मत्स्यगंधा सेवाभावी संस्था बीड, तुळजाभवानी बहु शिक्षण प्रसारक मंडळ गाडे पिंपळगाव या आठ संस्थांना बीड जिल्ह्यातील १६९ ग्रामपंचायत मध्ये घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनामध्ये उत्कृष्ट

काम करण्यासाठी सहाय्यकारी संस्थांची नेमणूक केली होती .मात्र या सर्व ग्रामपंचायतचे काम पूर्ण होऊन निधीही वितरित करण्यात आला आहे .या आठ संस्थांना सनियंत्रणाकरिता देण्यात आलेल्या तालुक्यातील ग्रामपंचायत मॉडेल झालेल्या नाहीत .याबाबत राज्याचे पाणी व स्वच्छता प्रकल्प संचालकांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली आहे. तरीही या आठ संस्था प्रकल्प संचालकांना जुमानत नाहीत. जाणीवपूर्वक या ग्रामपंचायती मॉडेल होत नाहीत येत्या सात दिवसात या ग्रामपंचायती मॉडेल झाल्या नाही तर उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुधाकर मुंडे यांनी तसा अहवाल प्रकल्प संचालकांना पाठवण्यात येईल अशी तंबी दिली आहे. मात्र या संस्थांना निधी यापूर्वीच वितरित झालेला आहे. गावे मॉडेल झाली नाही तर हा निधी शासनाकडून परत घेतला जाईल की खैरात म्हणून या संस्थांनाच बहाल केला जाईल. हे काळच ठरवणार आहे. सुरुवातीपासूनच या संस्थावर अंकुश असता तर ही वेळ आली नसती असे नागरिक चर्चा करीत आहेत.

'फेक न्यूज'ची माहिती देण्यासाठी स्वतंत्र क्रमांक जाहीर

बीड । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या कालावधीमध्ये ३९ बीड मतदारसंघातील 'फेक न्यूज'ची माहिती देण्यासाठी ८७८८९९८४९९ हा स्वतंत्र क्रमांक जाहीर करण्यात आला आहे. नागरिकांनी यावर फेक न्युज ची माहिती व्हॉट्सअप करावी.

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहीर झाला असून आचारसंहिता लागू झाली आहे. याकाळात उमेदवारांची प्रचारा दरम्यान बदनामी करणे, अफवा पसरविणे, द्वोषपुर्ण संदेश, खोटे संदेश तसेच प्रिंट मिडिया, इलेक्ट्रॉनिक मिडिया, सोशल मिडियाद्वारे प्रसारित होणाऱ्या फेकन्युजची माहिती नागरीकांकडून मिळण्यासाठी हा ८७८८९९८४९९ स्वतंत्र मोबाईल क्रमांक माध्यम प्रमाणिकरण व संनियत्रन समिती आणि मीडिया कक्षाकडून जाहीर करण्यात आला आहे. या क्रमांकावर व्हॉट्सअप करावे.८७८८९९८४९९ या क्रमांकावर नागरीकांकडून मिळालेल्या माहितीची नियंत्रण कक्षाकडून तसेच बीड सायबर पोलीस यांच्या मदतीने शहानिशा करुन आवश्यक कारवाई करावी करण्यात येईल.

भारताने श्रीलंका, यूएई येथे प्रत्येकी १०,००० मेट्रिक टन कांदा निर्यातीला दिली परवानगी!

पुणे । प्रतिनिधी

श्रीलंका, यूएईला प्रत्येकी १०,००० मेट्रिक टन कांदा निर्यात होणार. परराष्ट्र व्यापार महासंचालनालय मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार भारताने नॅशनल कोऑपरेटिव्ह एक्सपोर्ट्स लिमिटेड मार्फत श्रीलंका आणि संयुक्त अरब अमिराती मध्ये प्रत्येकी १०,००० मेट्रिक टन कांदा निर्यात करण्यास मान्यता दिली आहे.

ही अतिरिक्त १०,००० टन कांद्याची निर्यात यूएईला करण्यात येणार आहे. शिवाय यापूर्वी २४,४०० टन कांद्याची निर्यात झाली होती. भारतातून कांद्याच्या निर्यातीवरील बंदी ८ डिसेंबर २०२३ रोजी लागू करण्यात आली होती आणि ती ३१ मार्च २०२४ पर्यंत राहणार होती. अनियमित हवामान आणि पुरवठ्याच्या समस्यांमुळे सरकारने २०२३-२४ या आर्थिक वर्षात कांद्याच्या निर्यातीवर मर्यादा लादल्या. तथापि, डीजीएफटी अधिसूचनेनुसार, इतर राष्ट्रांनी केलेल्या विनंत्या यामुळे केंद्र सरकारच्या परवानगीनेच कांदा निर्यातीला परवानगी दिली जाईल. कांद्याच्या वाढत्या किमतीला आळा घालण्यासाठी केंद्र

सरकारने राखीव साठ्यातून कांदा बाहेर काढला होता. सुरुवातीला, सरकारने २०२३-२४ हंगामासाठी ३ लाख टन कांद्याचा बफर स्टॉक राखण्याचा मानस ठेवला होता, जो आधीच्या २०२२-२३ हंगामातील आरक्षित २.५१ लाख टनांपेक्षा अधिक होता. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयाने शुक्रवारी जारी केलेल्या अलीकडील आकडेवारीनुसार, किरकोळ चलन वाढीचा दर मार्च मध्ये ४.८५% या १० महिन्यांच्या नीचांकी स्तरावर पोहोचला आहे. शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात अन्नधान्य महागाईत वाढ ५.०९% होती.

यंदा शेती क्षेत्राच्या वृद्धी दरात ६ टक्क्यांनी वाढ होणार - रमेश चंद

पुणे : भारतीय हवामानशास्त्र विभागाने (आयएमडी) यावर्षी देशभरात सरासरीच्या तुलनेत १०६ टक्के अधिक पाऊस होण्याची शक्यता नुकतीच व्यक्त केली आहे. याशिवाय स्कायमेट या खासगी हवामान संस्थेने देखील यावर्षी देशात समाधानकारक पाऊस पडणार असल्याचे म्हटले आहे. अशातच आता ''यावर्षी शेती क्षेत्रातील विकास दरात ६ टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे. प्रामुख्याने मागील वर्षीच्या तुलनेत यावर्षी मॉन्सूनचा पाऊस हा चांगला बरसणार आहे. त्यामुळे ही वाढ दिसून येणार आहे.'' असे नीती आयोगाचे सदस्य रमेश चंद यांनी म्हटले आहे.

नीती आयोगाचे सदस्य रमेश चंद यांनी म्हटले आहे म्हटले आहे की, चालू वर्ष हे शेतीसाठी खूपच चांगले राहणार आहे. यामागे दोन प्रमुख कारणे आहेत, एक म्हणजे यंदा हवामान विभागासह विविध हवामान संस्थांनी मान्सूनचा पाऊस देशभरात सर्वदूर चांगला पडणार असल्याचे म्हटले आहे. आणि दुसरे कारण म्हणजे मागील वर्षी देशातील शेती क्षेत्राचा वृद्धी दर हा ०.६७ टक्के होता. अर्थात २०२४-२५ यावर्षी शेती क्षेत्राच्या वृद्धीसाठी बेस हा कमी असणार आहे. त्यामुळे यापूर्वी आतापर्यंत जेव्हा जेव्हा ही दोन कारणे असतात. तेव्हा या दोघांमुळे कृषी क्षेत्राचा वृद्धी दर हा ६ टक्क्यांहून अधिक असल्याचे पाहायला मिळाले आहे. असेही त्यांनी म्हटले आहे.

तर निर्यातीस परवानगी मिळणार...

याशिवाय यंदा खरीप हंगामाच्या मध्यावधीत काही कृषी मालाच्या उत्पादनात भरघोस वाढ होणार असल्याचे दिसून आले. तर अशा कृषी मालाच्या निर्यातीसाठी परवानगी दिली जाऊ शकते. सध्याच्या घडीला केंद्र सरकारकडून गैर-बासमती तांदूळ, गहू, साखर, कांदा यासह अनेक कृषी मालाच्या निर्यातीस बंदी घातली आहे. मात्र, यंदाच्या हंगामात चांगला पडल्यानंतर विविध पिकांच्या उत्पादनाचे संकेत समोर येताच या कृषीमालाच्या निर्यातीस मोकळीक दिली जाऊ शकते. असेही त्यांनी म्हटले आहे.

ब्लू जावा : निळ्या रंगाच्या केळीचे दुर्मिळ वाण

महाराष्ट्रात शेतकरी प्रामुख्याने पिवळ्या रंगाच्या केळीच्या मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतात. विशेष म्हणजे देशभरातील बाजारपेठांमध्ये आपली हीच केळी प्रसिद्ध आहेत. मात्र, अलीकडेच महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यात उजनी धरणाच्या काठावर एका शेतकऱ्याने 'ब्लू जावा' या निळ्या रंगाच्या विदेशी प्रजातीच्या केळीचे उत्पादन घेतले आहे. ज्यामुळे गेल्या काही दिवसांपासून सर्वीकडे या केळीची सर्वदूर चर्चा होताना दिसत आहे. विशेष म्हणजे या केळीबाबत अधिक जाणून घेण्याची इच्छा असलेला एक विशिष्ट शेतकरी वर्ग समाजमाध्यमांवर दिसून आला आहे.

'ब्लू जावा' केळी वाण हे दुर्मिळ वाण असून, त्याची लागवड अमेरिकेतील फ्लोरिडा प्रांतामध्ये मोठ्या प्रमाणात केली जाते. अमेरिकेतील ओगिल्वी प्रांतातील फॉर्मर ग्लोबल चीफ क्रिएटिव ऑफिसर असेलेल्या एका माजी अधिकाऱ्याने या केळी वाणाचा सर्वप्रथम ट्विटरवर उल्लेख केला. ज्यात त्यांनी म्हटले आहे की, आजपर्यंत कोणी मला 'ब्लू जावा' ही केळी लागवड करण्याबाबत का सुचविले नाही? या प्रजातीच्या केळीची चव ही पूर्णपणे आइसस्क्रीमसारखी आहे. तेव्हापासून हे केळी वाण जगभर प्रसिद्ध झाले असून, ते आता महाराष्ट्राच्या मातीत देखील फुलले आहे.

'ब्लू जावा' वाणाची वैशिष्ट्ये ?

'ब्लू जावा' वाणाचे फळ हे मध्यम आकाराचे असते. केळीच्या एका फणीत १० ते १२ फण्या

असतात. हे विदेशी वाण इतर स्थानिक वाणाप्रमाणेच दहा महिने कालावधीत काढणीला येते. ब्लू जावा केळीचा गर मलईसारखा असून, त्याची चव आईस्क्रीमसारखी असते. त्यामुळे या वाणाला 'आईस्क्रीम केळी' असे देखील म्हटले जाते.

'ब्लू जावा' केळीचे फायदे :

ही केळी उच्च फायबरयुक्त असल्याने नेहमी आहारात असेल तर वजन कमी करण्यात मदत होते. नियमित खाल्ल्याने पचनास मदत होते. ज्यामुळे ही केळी मूळव्याध, पोटातील अल्सर आणि गॅस्ट्रोएसोफेजल रिफ्लक्स रोग यासह अनेक पाचक विकारांवर रामबाण उपाय ठरते. या वाणाच्या केळीमध्ये अँटिऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात असते. ज्यामुळे ही केळी रोग प्रतिबंधात महत्त्वाची भूमिका बजावतात. हृदयरोग, मधुमेह आणि विशिष्ट कर्करोग यांसारख्या तीव्र परिस्थितींपासून संरक्षण करण्यास मदत करतात, असे मानले जाते. ज्यामुळे या वाणाला अधिक दर मिळतो.

जाणून घ्या वॉक इन टनेल : ज्याद्वारे अनेक भाज्या स्वस्तात पिकवता येतात

वॉक इन टनेल म्हणले बोगदा ही भाजीपाला उत्पादनासाठी कमी किमतीची बोगदा रचना आहे. त्याच्या मदतीने, ते बांबू आणि अतिनील संरक्षित पॉलिथिन शीटपासून बनवले जाते जे हंगामात नसलेल्या भाज्यांच्या लागवडीसाठी करतात. हे बोगदे १०० मायक्रॉन यूव्ही प्लॅस्टिक क्लेडिंग मटेरियल आणि बांबूच्या शिंगल्सचा वापर करून बांधले आहेत. अशा प्रकारे हे बोगदे अतिशय कमी खर्चात सहज बांधता येतात.

टनेल फार्मिंग म्हणजे बोगदे बनवून शेती करणे, आज हे एक तंत्र आहे जे केवळ भारतातच नाही तर जगभरात अनेक शेतकरी अवलंबत आहेत. या तंत्रज्ञानाचा सर्वात महत्वाचा उद्देश म्हणजे आच्छादनाखाली पिके वाढवणे आणि चांगला नफा मिळवणे. शिवाय, ते पर्यावरणासाठी देखील खूप

कमी खर्चात जास्त फायदे

वॉक-इन बोगदा ही भाजीपाला उत्पादनासाठी कमी किमतीची बोगदा रचना आहे. त्याच्या मदतीने, ते बांबू आणि अतिनील संरक्षित पॉलिथिन शीटपासून बनवले जाते जे हंगामात नसलेल्या भाज्यांच्या लागवडीसाठी करतात. हे बोगदे १०० मायक्रॉन यूव्ही प्लॅस्टिक क्लेडिंग मटेरियल आणि बांबूच्या शिंगल्सचा वापर करून बांधले आहेत. अशा प्रकारे हे बोगदे अतिशय कमी खर्चात सहज बांधता येतात. संरक्षक संरचनांखाली भाजीपाला उत्पादन केल्याने, कीड, रोग आणि अतिवृष्टीमुळे पिकाचे फारच कमी नुकसान होते. यामुळे फार कमी क्षेत्रात जास्त उत्पादनात यश मिळू शकते.

कोणत्या भाज्यांची लागवड करणे शक्य आहे?

या प्रकारच्या शेतीमध्ये बाटली, खरबूज, टरबूज, काकडी, भोपळा आणि इतर भोपळ्यासारख्या भाजीपाला हिवाळ्यात काढता येतो. या प्रकारच्या संरक्षित शेतीमध्ये जेव्हा दिवसा सूर्यप्रकाश प्लास्टिकवर पडतो तेव्हा बोगद्याच्या आतील तापमान सुमारे १० ते १२ अंशांनी वाढते. यामुळे कमी तापमानातही भोपळ्यासारख्या इतर भाज्या यशस्वीपणे पिकवण्यास मदत होते.

हे तंत्र कधी वापरायचे :

वॉक-इन- बोगद्याची लांबी आवश्यकतेनुसार वाढवता येते. परंतु सहसा त्यांची लांबी २५ ते ३० मीटर असते. ते तात्पुरते असल्याने त्यांची काळजी सहज घेता येते आणि त्यामुळे त्यांच्या देखभालीचा खर्चही कमी असतो. तथापि, ही रचना केवळ हिवाळ्याच्या हंगामात म्हणजे डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत पीक उत्पादनासाठी वापरली जाऊ शकते. उन्हाळ्यात अंतर्गत तापमान खूप वाढते. तसेच हवाई देवाणघेवाण नसल्यामुळे पिके वाढू शकत नाहीत. हे तंत्र डोंगराळ भागात जास्त काळ भाजीपाला उत्पादनासाठी वापरले जाते.

चांगले मानले जाते. शेतकरी या तंत्रज्ञानाचा वापर केवळ त्यांच्या उत्पन्नासाठीच नाही तर उदरनिर्वाहासाठीही करतात. अनेक देशांमध्ये जिथे खूप गरिबी आहे, शेतकरी या तंत्रज्ञानाचा वापर स्वत:चे पोट भरण्यासाठी करतात. या तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकरी अशा भाजीपाला पिकवू शकतात ज्याची किंमत खूपच कमी आहे आणि त्यांना नफाही मिळतो.

इफ्को लाँच करणार उच्च नायट्रोजनयुक्त 'नॅनो युरिया प्लस'

पुणे : ''इफ्को नॅनो यूरिया प्लस'' हे नॅनो युरियाचे प्रगत फॉर्म्युलेशन सरकारच्या मंजुरीनंतर इफ्को लाँच करणार आहे. कृषी मंत्रालयाने १६ एप्रिल रोजी तीन वर्षांसाठी वैध असलेली इफकोच्या नॅनो युरियाची वैशिष्ट्ये अधिसूचित केली, ज्या अंतर्गत इफकोच्या नॅनो-युरियामध्ये वजनानुसार किमान १६% नायट्रोजन असणे आवश्यक आहे.

२०२१ मध्ये जारी करण्यात आलेल्या पहिल्या अधिसूचनेची मुदत संपल्यानंतर सरकारने नॅनो-युरियाची वैशिष्ट्ये बदलून, उच्च नायट्रोजन सामग्री निर्धारित केली होती. त्याच बरोबर, इफकोने नवीन द्रव नॅनो युरिया प्लस लाँच करण्याची घोषणा केली आहे. संभाव्य आगामी खरीप हंगामासाठी नवीन उत्पादनाचे उत्पादन सध्याच्या सुविधेनुसार पुढील ७-१० दिवसांत सुरू होण्याची शक्यता आहे.

२४ फेब्रुवारी २०२१ रोजी जारी करण्यात आलेल्या याआधीच्या अधिसूचनेमध्ये, जी तीन वर्षांसाठी देखील वैध होती, वजनानुसार नायट्रोजन टक्केवारी १ ते ५ दरम्यान विहित करण्यात आले होते. युरियाच्या पारंपारिक दाणेदार पिशवीत नायट्रोजनचे प्रमाण ४६ टक्के असते, काही तज्ज्ञांनी अत्यंत कमी नायट्रोजनसह परवानगी असलेल्या नॅनो-युरियाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. राजस्थान, हरियाणा, पंजाब आणि उत्तर प्रदेशमध्ये अनेक ठिकाणी अपेक्षित उत्पादन न मिळाल्याने शेतकर्यांनी नॅनो-युरियाचा वापर केला नाही. नॅनो-युरिया खरेदी करण्यास शेतकऱ्यांच्या विरोधामुळे या राज्यांमध्ये द्रव खतांची सक्तीने विक्री करावी लागली आणि शेतकऱ्यांच्या तक्रारींनंतर सरकारला कंपन्या आणि किरकोळ विक्रेत्यांना पारंपरिक पिशवीत नॅनो-युरिया टॅग न करण्याचे आदेश जारी करावे लागले. ''५०० मिलीची एक नॅनो-युरिया बाटली ही ४५ किलोग्रॅम ग्रॅन्युलर युरियाची बाटली समतुल्य असल्याचा दावा सरकारने केला, तेव्हा अनेक शेतकऱ्यांनी त्यावर विश्वास ठेवला आणि त्या प्रिस्क्रिप्शनचे पालन केल्यावर उलट परिणाम मिळाले.

''इफ्को नॅनो यूरिया प्लस हे नॅनो युरियाचे प्रगत फॉर्म्युलेशन आहे, ज्यामध्ये पिकांच्या वाढीच्या टप्प्यावर नायट्रोजनची गरज पूर्ण करण्यासाठी पोषण आहे. हे पारंपरिक युरिया आणि इतर नायट्रोजनयुक्त खतांच्या जागी मातीचे आरोग्य, शेतकऱ्यांचा नफा आणि शाश्वत पर्यावरणाला चालना देण्यासाठी वापरले जाते. हे सूक्ष्म पोषक घटकांची उपलब्धता आणि कार्यक्षमता देखील वाढवते. हे क्लोरोफिल चार्जर, उत्पन्न वाढवणारे आणि हवामान स्मार्ट शेतीसाठी मदत करणारे सुद्धा आहे. नॅनो युरिया प्लसची विक्री किंमत सारखीच असण्याची शक्यता आहे.

युरियाचा वापर कमी झालेला नाही- ए.के.सिंग

सध्या युरियाचा वापर कमी करण्याबद्दल सरकार सांगत आहे, परंतु तज्ज्ञ युरियाचा वापर कमी करण्याचे सांगण्याऐवजी युरियाच्या ४ पिशव्यांऐवजी तीन पिशव्या आणि एक बाटली नॅनो-युरियाची वापरा असे लिहून देतात. म्हणजेच युरियाचा वापर कमी झालेला नाही असे कृषी शास्त्रज्ञ ए के सिंग यांनी म्हटले. इफ्को नॅनो यूरिया प्लस मध्ये सध्याच्या नॅनो यूरियापेक्षा चार पटीने जास्त नायट्रोजन आहे. त्यामुळे नॅनो युरिया प्लसचे चांगले परिणाम मिळू शकतात असेही ए के सिंग यांनी नमूद केले.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

- १४५१ : मुघल सुलतान बहलोल लोदी यांनी दिल्लीवर आपला राज्यभिषेक केला. दिल्लीच्या शासक पदी जाणारे ते पहिले अफगाण सुलतान होते
- १५२६ : मोगल साम्राज्याचा संस्थापक बाबर यांचा मोगलसत्तेचा पाया घातला.
- १५८७ : सर फ्रांसिस ड्रेकने केडिझच्या बंदरात स्पेनच्या आरमाराचा पराभव केला.
- १७७० : ब्रिटीश खोजकर्ता, नाविक, मानचित्रकार आणि रॉयल नेवीचे कप्तान जेम्स कुक ऑस्ट्रेलिया देशांत जाणारे पहिले व्यक्ती बनले.
- १७७५ : अमेरिकन क्रांती कॉंकॉर्ड व लेक्झिंग्टनची लढाई.
- १८१० : व्हेनेझुएलाने स्पेनपासून स्वातंत्र्य जाहीर केले.
- १८३९ : १८३९चा लंडनचा तह बेल्जियम स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात.
- १९०४ : कॅनडातील टोरोंटो शहर आगीत भस्मसात.
- १९०९ : जोन ऑफ आर्कला संत घोषित करण्यात आले.
- १९१९ : अमेरिकेच्या लेस्ली अर्विनने सर्वप्रथम पॅराशुटच्या सहाय्याने विमानातून उडी मारली.
- १९३६ : पॅलेस्टाईनमध्ये उठाव.
- १९४५ : सोविएत रशिया आणि ग्वाटेमालामधे राजनैतिक संबंध प्रस्थापित झाले.
- १९४८ : ब्रह्मदेशचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश.
- १९५६ : गीतरामायणातील शेवटचे गाणे पुणे आकाशवाणीवरुन प्रसारित झाले.
- १९६० : दक्षिण कोरियात राष्ट्राध्यक्ष सिंगमन ह्री विरुद्ध विद्यार्थ्यांची निदर्शने.
- १९६१ : पिग्सच्या अखातातील आक्रमण घुसखोरांचा पराभव.
- १९७१ : सियेरा लिओन प्रजासत्ताक झाले. सियाका स्टीवन्स राष्ट्राध्यक्षपदी.
- १९७१ : रशियाने सर्वप्रथम मानवनिर्मित अंतराळस्थानक सॅल्युत १चे प्रक्षेपण केले.
- १९७५ : एक्स-रे खगोलशास्त्र, वैमानिकी आणि सौर भौतिकी येथे प्रयोग करण्यासाठी भारतीय अंतराळ संशोधन संघटनेने (इस्रो) तयार केलेला पहिला भारतीय उपग्रह आर्यभट याचे प्रक्षेपण करण्यात आले.
- १९७८ : लागुमॉट हॅरिस नौरूच्या राष्ट्राध्यक्षपदी.
- १९८९ : यु.एस.एस. आयोवा या अमेरिकेच्या युद्धनौकेवर स्फोट. ४७ ठार.
- १९९३ : वेको, टेक्सास येथे ब्रांच डेव्हिडीयनच्या इमारतीस आग. ८१ ठार.
- १९९५ : ओक्लाहोमा सिटी येथे आल्फ्रेड पी. मरा फेडरल बिल्डींग मध्ये अमेरिकन अतिरेक्यांनी बॉम्बस्फोट घडवला. १६८ ठार.
- १९९९ : जर्मनीची संसद परत बर्लिन येथे.
- २००० : एर फिलिपाईन्सचे बोईंग ७३७ जातीचे विमान दाव्हाओ आंतरराष्ट्रीय विमानतळावर कोसळले. १३१ ठार.
- २००५ : जोसेफ रॅट्झिंगर पोप बेनेडिक्ट सोळावा या नावाने पोपपदी.
- २००६ : अमेरिकन अंतराळ यात्री नील आर्मस्ट्रॉंग यांनी आणलेला चंद्राचा तुकडा त्यांना भेट देण्यात आला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

- १७८० : सतराव्या शतकातील अवध प्रांताचे चौथे नवाब वजीरअली खान यांचा जन्मदिन.
- १८६८ : रोटरी क्लबचे संस्थापक पॉल हॅरिस यांचा जन्म. (मृत्यू: २७ जानेवारी १९४७)
- १८९२ : ताराबाई मोडक, भारतातील सुप्रसिध्द बालशिक्षणतज्ज्ञ.
- १९१२ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ ग्लेन सीबोर्ग यांचा जन्म. (मृत्यू: २५ फेब्रुवारी १९९९)
- १९२२ : जर्मन लढाऊ वैमानिक एरिच हार्टमैन यांचा जन्मदिन.
- १९३० : मालती पांडे, सुप्रसिद्ध गायिका.
- १९३३ : डिकी बर्ड, इंग्लिश क्रिकेटपंच.
- १९३६ : विल्फ्रीड मार्टेन्स, बेल्जियमचा पंतप्रधान.
- १९३७ : जोसेफ एस्ट्राडा, फिलिपाईन्सचा अभिनेता व राष्ट्राध्यक्ष.
- १९४६ : 'आंध्र पुरस्कार' सन्मानित भारतीय शास्त्रीय गायिका तसचं, उस्ताद आमिर खान यांच्या अधिपत्याखाली प्रशिक्षण घेतलेल्या भारतीय शास्त्रीय गायिका कंकना बॅनर्जी यांचा जन्मदिन.
- १९५० : भारताचे एकोणिसावे निवडणूक आयुक्त हरिशंकर ब्रह्मा यांचा जन्मदिन.
- १९५७ : मुकेश अंबानी, सुप्रसिद्ध उद्योगपती.
- १९६८ : अर्शद वारसी, हिंदी चित्रपट अभिनेता.
- १९६८ : म्स्वाती तिसरा, स्वाझीलँडचा राजा.
- १९७५ : जेसन गिलेस्पी, ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू.
- १९७७ : भारतीय लाँग जम्पर अंजू बॉबी जॉर्ज यांचा जन्म.
- १९८७ : मारिया शारापोव्हा, रशियन टेनिस खेळाडू.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

- १५७८ : उएसुगी केन्शिन, जपानी सामुराई.
- १८८१ : बेंजामिन डिझरायेली, युनायटेड किंग्डमचा पंतप्रधान.
- १८८२ : ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ चार्ल्स डार्विन यांचे निधन. (जन्म: १२ फेब्रुवारी १८०९)
- १९०६ : पिएर क्युरी, फ्रेंच संशोधक, नोबेल पुरस्कार विजेता.
- १९१० : साली क्रांतिकारक कृष्णाजी गोपाल कर्वे यांना नशिक येथील ब्रिटीश जिल्हाधिकारी जॅक्सन यांना क्रांतिकारक अनंत कान्हेरे आणि विनायक नारायण देशपांडे यांच्या सोबत मिळून गोळ्या झाडल्या प्रकरणी त्यांना फाशी दिण्यात आली.
- १९५५ : ब्रिटिश-भारतीय वन्यजीव तज्ज्ञ आणि लेखक जिम कॉर्बेट यांचे निधन. (जन्म: २५ जुलै १८७५)
- १९६७ : कॉन्राड अडेनॉउअर, जर्मनीचा चान्सेलर.
- १९७४ : अयुब खान, पाकिस्तानचा पंतप्रधान.
- १९९३ : स्वातंत्र्यसैनिक डॉ. उत्तमराव पाटील यांचे निधन.
- १९९४ : पंजाबचे माजी मंत्री मेजर जनरल राजिंदरसिंग उर्फ स्पॅरो यांचे निधन.
- १९९८ : उद्योजीका सौ. विमलाबाई गरवारे यांचे निधन. (जन्म: १८ डिसेंबर १९२८)
- २००३ : भारतीय-इंग्रजी खलीफा मिर्जा ताहिर अहमद यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १९२५)
- २००४ : गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड चे सहसंस्थापक नॉरिस मॅक्किहिर यांचे निधन.
- २००८ : लेखिका, संतसाहित्याच्या अभ्यासिका व राजकारणी सरोजिनी बाबर यांचे निधन. (जन्म: ७ जानेवारी १९२०)
- २००७ : दूरदर्शन कार्टूनिस्ट मालिका द विजार्ड आफ़ आईडी चे व्यंगचित्रकार ब्रैंड पार्कर याचं निधन.
- २००९ : मार्क्सवादी कम्युनिस्ट नेत्या अहिल्या रांगणेकर यांचे निधन. (जन्म: ८ जुलै १९२२)
- २०१० : लेखक आणि टीकाकार मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचे निधन. (जन्म: ७ जून १९१३)

अवकाळी पाऊस,वादळी वाऱ्यामुळे शेतकरी संकटात

शेतकऱ्यांचा संसार उघड्यावर आला ; मदत मिळवून देण्याचे डॉ.ज्योती मेटेंचे आश्वासन

शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या- डॉ. ज्योती मेटे

बीड। प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून बीड जिल्ह्यात अवकाळी पावसाने कहर केला आहे . यात मागील आठवड्यात झालेल्या गारपीटमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले होते. यात आता काल दि १७ रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्या मुळे शेतकरी आणखीनच संकटात सापडला आहे. अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांचे जनावरे दगावली , झाडे उन्मळून पडली तर काही जणांच्या घरांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यात शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आज शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली यावेळी त्यांनी त्यांनी शेतकऱ्यांना दिलासा देत शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानाचे तात्काळ पंचनामे करून त्यांना मदत देण्याची बाबत संबंधित मंडळ अधिकारी,तलाठी, तहसीलदार यांना समक्ष सूचना दिल्या.

काल अचानक विजेच्या कडकडाटासह वादळी वारे व गारपीट यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले . वीज पडून शेळ्या - म्हैस दगावली गेल्याच्या काही घटना घडल्या . तसेच जोराच्या वाऱ्याने मोठ-मोठी झाडे उमळून पडली . घरावरील पत्रे उडून गेले . गोरगरिबांचा संसार उघड्यावर आला . याचा सर्वाधिक तडाका बीड तालुक्यातील नाळवंडी महसूल मंडळाला बसला या भागाची पाहणी डॉ. ज्योती मेटे यांनी केली यावेळी उपस्थित मंडळ अधिकारी आणि तलाठी यांना तात्काळ पंचनामे करून योग्य ती कारवाई करून नुकसानग्रस्त नागरिकांना तात्काळ मदत देण्याच्या सूचना यावेळी केल्या तसेच तहसीलदार यांना भ्रमणध्वनीवरून चर्चा करत झालेल्या नुकसानाची कल्पना दिली आणि प्रशासनाने तात्काळ उपाययोजना कराव्यात अशा सूचना दिल्या.याप्रसंगी नितीनजी लाटकर, शिवसंग्रामचे नवनाथ प्रभाळे,ऍड. गणेश मोरे, अक्षय माने, विजय सुपेकर पंडित माने, बळीभाऊ थापडे सिताराम घुमरे, राजेंद्र आमटे शहादेव काकडे ,ज्ञानेश्वर कोकाटे ,गोपीनाथ घुमरे,सुनील कुटे, महादेव कानडे,शैलेश सुरवसे, बाळू मोरे,शिवराज उगले तसेच ग्रामसेवक तलाठी महसूल मंडळ व अन्य शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

बजरंग सोनवणेंच्या अर्धांगिनी उतरल्या प्रचारात

सारिकाताई सोनवणेंनी घेतली केजमध्ये महिलांची कॉर्नर बैठक

केज

बीड लोकसभेचे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे व इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी उमेदवारी जाहीर होताच जिल्ह्यात गाठीभेटी सुरू केल्या आहेत. त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्यापुर्वी प्रत्येक तालुक्यातील अनेक गावांना भेटी दिल्या असून प्रत्येक गावात अभूतपूर्व स्वागत व नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. तर त्यांच्या अर्धांगिनी जिल्हा परिषद सदस्या सारीकाताई सोनवणे या प्रचारात उतरल्या आहेत. त्यांनी शहरातील क्रांतीनगर भागात महिलांची कॉर्नर बैठक घेतली.

मागील लोकसभेच्या निवडणुकीत निसटत्या मतांनी पराभव झालेल्या बजरंग सोनवणे यांनी मतदारांचा सन्मान राखण्यासाठी पुन्हा निवडणुकीच्या मैदानात उडी घेतली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून उमेदवारी जाहीर होताच बजरंग सोनवणे यांनी पायात भिंगरी बांधून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात जाऊन जास्तीत जास्त मतदारांशी कसा संवाद साधता येईल. असे तालुका निहाय प्रचार दौऱ्याचे नियोजन करीत भेटीगाठीवर भर दिला आहे. काँग्रेस, उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना या प्रमुख पक्षांच्या नेत्यांचे आशीर्वाद आणि मित्र पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना सोबत घेत जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याचे दौरे सुरू आहेत. मतदार संघातील अनेक गावात प्रचार दौरे करीत जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे. गावांमध्ये ग्रामदैवत, विविध देव देवतांच्या मंदिरात जाऊन दर्शन घेत व महापुरुषांच्या नावे असलेल्या चौकात पुष्पहार अर्पण व अभिवादन करीत कॉर्नर बैठका, मतदारांच्या संवाद साधून त्यांनी जिल्ह्यातील वातावरण ढवळून काढले आहे. गावा - गावात नागरिकांकडून होत असलेले अभूतपूर्व स्वागत, महिलांकडून औक्षण आणि नागरिकांचा चांगला प्रतिसादाने त्यांचा उत्साह वाढला आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्यापूर्वी त्यांनी तालुका निहाय झंझावाती दौरे काढून कडक उन्हात गावा - गावाना भेटी देत नियोजनबद्ध प्रचार सुरूआहे. बजरंग सोनवणे यांचे प्रचार दौरे सुरू असताना त्यांच्या अर्धांगिनी जिल्हा परिषद सदस्या सारीकाताई सोनवणे या प्रचारात उतरल्या आहेत. गेल्या निवडणुकीत त्यांनी प्रचाराची धुरा सांभाळत महिला मतदारांतून चांगला प्रतिसाद मिळविला होता. या निवडणुकीत त्यांनी प्रचाराला सुरुवात केली असून केज शहरात नगरपंचायतीच्या प्रभाग क्र. १ पासून सुरुवात केली आहे. या प्रभागातील क्रांती नगर भागात महिलांची कॉर्नर बैठक घेत महिलांशी संवाद साधला. महिला मतदारांच्या अडीअडचणी जाणून घेत त्यांनी बजरंग सोनवणे यांना मत देण्याचे आवाहन केले. यावेळी महिला आघाडीच्या तालुकाध्यक्षा शीतल लांडगे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्त्यांसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पंकजा मुंडेंच्या प्रचारार्थ क्षीरसागर दाम्पत्य लागले कामाला

पाली येथे विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीमध्ये बैठक

बीड

तालुक्यातील पाली येथे महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्त्यांची गुरुवारी (दि.१८) कॉर्नर बैठक पार पडली. राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीस उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

यावेळी बोलताना डॉ.योगेश क्षीरसागर म्हणाले की, केंद्र सरकारकडून जिल्ह्याच्या विकासासाठी भरीव निधी खेचून आणण्याची ताकद पंकजाताई मुंडे यांच्यात आहे. त्यांच्या सक्षम नेतृत्वाखाली जिल्हा विकासाच्या वाटेवर येणार आहे. त्यामुळे पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी सर्वांनी कामाला लागावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस बप्पासाहेब घुगे, शिवाजी रोहिटे, धनराज थोरात, संदीप नवले, सचिन सोळुंके, अर्जुन बहिरवाळ, राम बहिरवाळ, अभिमान खांडेकर, नवनाथ शिंदे, मिठू शिंदे, अजित डोंगरे, रमेश रांजवन, अक्षय घाडगे, कृष्णा सोळुंके, धनंजय राऊत, पिंटू सपकाळ, जावेद शेख, अशोक शेळके, मोहन शेळके, माधवराज जाधव, दत्ता खरात, भारत रूपनर, डॉ.दत्ता सोळुंके, श्रीमंत पन्हाळे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

क्षीरसागर दाम्पत्यांच्या बैठका

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.सरिकाताई क्षीरसागर यांनी बैठक, कॉर्नर बैठकांचा सपाटा लावला आहे. क्षीरसागर दाम्पत्य हे निवडणूक प्रचार सुरू झाल्यापासून अविरतपणे दौरे करत आहे. दिवसभर जिल्हा परिषद गटात आणि सायंकाळी बीड शहरातील प्रभागात दौरे सुरू आहेत. त्यांच्या व सहकाऱ्यांच्या परिश्रमामुळे बीड मतदारसंघातून पंकजाताईंना मताधिक्य मिळू शकते.

तत्काळ आपत्ती निवारण मधून मदत द्या- राजेंद्र आमटे

बीड

अचानक होत असलेल्या अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपीट यामुळे शेतकऱ्याच्या शेतात उभे असणारे आंबा, मोसंबी, उन्हाळी बाजरी, ज्वारी,टरबूज,खरबूज पिकाची नासाडी झाली. अनेकांचे आंबा, मोसंबी बागा मोडल्या, बाजरी ज्वारी लोळू लागले आहे. टरबूज खरबूज पिकांची पावसामुळे नासाडी झाली आहे. शेतकऱ्यांचे गोठे मोडले, प्रशासनातील अधिकारी आचारसंहितेच्या नावाखाली सुस्त आहेत एरवी शेतकऱ्याच्या नावावर मताचा जोगवा मागणारे लोकप्रतिनिधी उमेदवार आज शेतकरी अवकाळी पाऊस, वादळी वारे व गारपीटीने उद्ध्वस्त झालेला असून उमेदवार प्रचारात दंग आहेत हे अतिशय दुर्दैवी आहे प्रशासनाने या गोष्टीचे गांभीर्याने विचार करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत तत्काळ मदत देण्यात यावी अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, तालुका अध्यक्ष अर्जुन सोनवणे, रमेश जगताप, संपत गव्हाणे, संजय तीपाले, सुधाकर काकडे, कृष्णा मसुरे, शेलेश सुरवसे, कैलास शेजवळ,आदीच्या वतीने मागणी करण्यात येते.

नगरपरिषद बीड यांनी वर्ग केलेल्या कामाची सखोल चौकशीची मागणी

वादग्रस्त उपअभियंता बोराडे यांनी कागदोपत्री कामे पूर्ण केल्याचा सरवदे यांचा आरोप

बीड । प्रतिनिधी

नगरपरिषद बीड यांनी सार्वजनिक बांधकाम उपविभाग बीड यांना कोट्यावधी रुपयांचे कामे वर्ग केले होते. त्यानंतर सदरील कामे पुन्हा नगर परिषद बीड यांच्याकडे वर्ग करण्याचे प्रक्रिया सुरू होती ती पुन्हा रद्द झाली सदरील कामास जिल्हाधिकारी बीड यांनी प्रशासकीय मान्यता दिली परंतु उपअभियंता बोराडे यांनी कामे न करता मोजमाप पुस्तिका बनवत बिल उचलले आहेत. सदरील कामे पूर्ण केली आहेत किंवा नाही याची चौकशी करणे करिता कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड यांनी समिती गठीत करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये माहिती मागितली असता देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात आहे. उपअभियंता बोराडे यांचेकडे उपविभाग बीड यांचेकडे पदभार आल्यापासून प्रचंड प्रमाणात अनियमितता झाली आहे. तसेच एकमेकमाविषयी कार्यालयीन गोपनीय माहिती त्रयस्थ व्यक्तिस पुरवण्यात येत असल्याचे दिसून आले.

सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे इंजि.ठाकूर गेल्या ५ ते ७ वर्षांपासून बीडमध्येच काम करत असून ते या ठिकाणचे रहिवासी असताना निवडणुकीमध्ये त्यांची बदली होणे अपेक्षित होते, तसेच त्यांच्या कार्यकाळामध्ये असंख्य बोगस कामे झाले आहेत याची सखोल चौकशी करण्यासाठी कार्यकारी अभियंता तोंडे यांच्याकडे तक्रार दिली असतात कारवाई करण्यास टाळाटाळ करत असल्याचे दिसून येत आहे. आदर्श आचारसंहिता संपल्यानंतर आंदोलन करत पाठपुरावा करणार आहे.

अजय सरवदे

मोफत पाणपोईसह विविध उपक्रम राबवून डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

बीड । प्रतिनिधी

एकनाथ नगर भक्ती कन्स्ट्रक्शन बीड येथे प्रतिवर्षीप्रमाणे महामानव जन्मोत्सव समितीच्या वतीने संस्थापक अध्यक्ष माणिक वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती विविध सामाजिक उपक्रम राबऊन मोठ्या उत्साहात साजरी झाली. या कार्यक्रमास विशेष उपस्थिती म्हणून भंते धम्मशील व बौद्धाचार्य सदाशिव कांबळे हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर हे उपस्थित होते या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक सुभाष सपकाळ,कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी अध्यक्ष अरुण डाके,मा.दिनकराव कदम, दूध संघाचे चेअरमन विलास बडगे माजी नगरसेवक विलास विधाते गजानन मंदिर ट्रस्ट अध्यक्ष राजेश पिंगळे माजी नगरसेवक मुकुंद भालेकर प्रसिद्ध डॉ.सुभाष जोशी शेळके कन्स्ट्रक्शन चे मालक शहादेव शेळके , गणेशजगताप, बबन राठोड, प्रशांत पवळ सर इत्यादीं मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना माजी मंत्री क्षीरसागर म्हणाले की भक्ती कन्स्ट्रक्शन परिसर हा सर्व जाती धर्माचा व सर्वधर्म समभाव जपणारा आणि राष्ट्रीय एकात्मता जोपासणारा असा हा परिसर आहे भक्ती नावाप्रमाणेच सर्व परिसर हा भक्तीमय आहे या ठिकाणी गेली अनेक वर्षापासून या परिसरातील सर्वांना परिचित असलेले वाघमारे बंधू माणिक आणि संजय व त्यांचे सहकारी विविध सामाजिक उपक्रम,विविध स्पर्धा, विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या मान्यवरांना विविध पुरस्काराचे वितरण, कामगारांना मदत, आरोग्य शिबिर,विविध सामाजिक उपक्रम राबवून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती ही सर्व जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन साजरी करतात या महापुरुषांचे विचार खर्या अर्थाने समाजात जोपासण्याचे ते काम करतात सध्या लोकसभा निवडणुकीमुळे आदर्श अचारसंहिता चालू असल्यामुळे मी त्यांना कार्यक्रम छोट्या स्वरूपाचा घेऊन आदर्श आचारसंहितेचे पालन करावे अशी सूचना केली होती त्याप्रमाणे आता ऊन खूप आहे उन्हाळा तीव्र आहे आणि अशावेळी मोफत पाणपोई व अन्नदान करणे तसेच विविध सामाजिक उपक्रम राबवने हे पुण्याचे काम असून त्याबद्दल दोन्ही बंधूंचे व त्यांच्या सर्व उत्सव समितीचे अभिनंदन करतो आणि सर्व समाज बांधवांना महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या शुभेच्छा देतो असे म्हणून त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले .या कार्यक्रमास भक्ती कंट्रक्शन परिसरातील शेकडे साहेब, हाडे साहेब, नाईक साहेब, डॉ संपत वाघमारे ,लक्ष्मण वंजारे ,सुनिल कुलकर्णी,चंद्रशेन वंजारे,विजय तरकसे,माजी पोलीस अधिकारी ,भागवतराव वाघमारे व विठ्ठलराव सरोदे, पत्रकार जोशी साहेब, माझी प्रशासकीय अधिकारी के एस वाघमारे, शिवाजी कुलकर्णी, प्रा. जोगदंड सर ,प्रा.भोसले सर, प्रा.कंधारे सर,लक्ष्मण सोनवणे उत्तम वाघमारे, बाळासाहेब वाघमारे ,आत्माराम वाघमारे, विजय वाघमारे ,नवनाथ वाघमारे, राहुल वाघमारे, मसु वाघमारे असंख्य मान्यवर महिला भगिनी उपस्थित होत्या हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महामानव जन्मोत्सव समितीचे निमंत्रक मा.आमोल भैय्या बारस्कर यांनी व सर्व समितीने खूप मेहनत घेतली या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय वाघमारे यांनी केले.

आसेफनगरच्या नाला क्रॉसिंगचे काम सुरू

बीड । प्रतिनिधी

शहरातील आसेफ़नगरच्या नाला क्रॉसिंगचे काम मंगळवार दिनांक १६ एप्रिल २०२४ पासून सुरू करण्यात आले आहे. यामुळे नागरिकांनी पर्यायी मार्ग वापरावे असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम. युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात नमूद केलेले आहे की, आसेफ़नगरचा मुख्य रस्ता व नाल्याचे काँक्रीटीकरण साधारणतः गेल्या दीड वर्षापासून कासवगतीने सुरू आहे. शिवाजीनगर पोलीस ठाणे कॉर्नर पासून सुरू झालेले काँक्रिटीकरण गेल्या दीड वर्षात सुद्धा थोरातवाडी कॉर्नर पर्यंत पूर्ण करण्यात आले नाही. आता बऱ्याच दिवसांच्या खंडानंतर उर्वरित कामास पुन्हा एकदा सुरुवात झाली असून थोरातवाडी कॉर्नर लगत असलेला आसेफ़नगरच्या हद्दीत येणारा व शहरातील जवळपास चार किलोमीटर लांबून वाहणारा नाला बनविण्याकरिता काँक्रिटीकरण करून काही महिन्यांपूर्वीच बनविलेला रस्ता काल मंगळवार दिनांक १६ एप्रिल २०२४ रोजी पुन्हा एकदा खांदण्यात आला. नाल्यासाठी आवश्यक असलेले खोदकाम झाले असून आता बांधकामास कधी मुहूर्त लागतो हे माहित नाही परंतु जोपर्यंत नाल्याचे बांधकाम पूर्ण होऊन त्यावर स्लॅब टाकून रस्ता पुर्ववत सुरू होत नाही तोपर्यंत हा रस्ता वाहतुकीसाठी व रहदारीसाठी बंद राहणार आहे. यामुळे या मार्गाचा वापर करणाऱ्या नागरिकांनी तोपर्यंत या रस्त्याऐवजी अन्य पर्यायी मार्गांचा वापर करावा असे आवाहन मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केले आहे.

पाच वर्षे देऊन बघा; बीड जिल्ह्याचं भविष्य उज्ज्वल केल्याशिवाय राहणार नाही

जाटनांदूर,उंदरखेल येथील जाहीर सभेत पंकजाताई मुंडे यांचे आवाहन; जिल्हयाचा खरा विकास पंकजाताईंमुळेच ; त्यांना खंबीर साथ द्या - आ. सुरेश धस

शिरूर कासार । प्रतिनिधी

लोकसभा निवडणूक एक प्रकारे महायुद्ध आहे आणि हे महायुद्ध आहे म्हणूनच मला उमेदवारी मिळाली आहे. या निवडणुकीत सर्वांना सोबत घेऊन त्यांना दिलेला शब्द पाळण्यासाठी पक्षाने मला उमेदवारी दिली आहे, त्यामुळे मला पाच वर्षे देऊन बघा, जिल्हयाचं भविष्य उज्ज्वल केल्याशिवाय राहणार नाही असं आवाहन भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यानी जाहीर सभांमधून मतदारांना केलं आहे.पंकजाताई मुंडे यांनी कायम समाज हिताची कामे केली.राज्य मंत्रिमंडळात चार खात्यांची जबाबदारी सांभाळताना त्यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी भरघोस निधी दिला, त्यामुळे भविष्यातही बीड जिल्ह्याला विकासाच्या उंचीवर नेण्यासाठी पंकजाताईंच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले.

पंकजाताई मुंडे यांनी प्रचाराचा तिसरा टप्पा आज जाहीर सभांच्या माध्यमातून सुरू केला असून जाटनांदुर, उंदरखेल येथे आज त्यांची जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी त्या बोलत होत्या. व्यासपीठावर आ. सुरेश धस यांच्यासह शिरूरचे नगराध्यक्ष रोहिदास पाटील, विजय गोल्हार, दत्ता काकडे, शैलजा गर्जे, वाल्मिक निकाळजे, अमोल तरटे, वारे मामा, सरपंच सचिन माने, ज्योतीताई दहातोंडे, अरुण भालेराव, रामदास बडे, चंपावती पानसंबळ, हनुमंत डोंगर, राजेंद्र चव्हाण, ज्ञानदेव डोंगर आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना पंकजाताई म्हणाल्या, शौर्याबरोबरच स्त्रियांमध्ये धैर्यही असते. एखाद्याला एकदा शब्द दिला की, मान कापून देऊ पण शब्द मागे घ्यायचं नाही हे मला मुंडे साहेबांनी शिकवले आहे. आजपर्यंत राजकीय जीवनात असताना मी असंख्य वेळा भाषणे केली; परंतु या भाषणादरम्यान मी केलेले वक्तव्य मला मागे घ्यायची कधीच वेळ आली नाही. मी प्रत्येकवेळी दिलेला शब्द पाळते. ग्रामविकास मंत्री असताना बीड जिल्ह्याच्या विकासासाठी सुरेश धस यांनी त्यांच्या गटातील पाच जि.प. सदस्य मला दिले, तेव्हा बीड जि.प.भाजपाच्या ताब्यात आली होती. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून जिल्ह्यात विकासाच्या योजना त्यावेळी राबवता आल्या होत्या. या दरम्यान मी सुरेश धस यांना आमदारकीचा शब्द दिला होता अर्थात त्यामागे त्यांचीही शक्ती होती पण एकदा शब्द दिला की मी मागे घेत नाही असे त्या म्हणाल्या.

जनतेची सेवा करताना कधी जात बघत नाही

जिल्ह्याच्या विकासाला पुढे घेऊन जाण्यासाठी ही निवडणूक महत्त्वाची आहे. दिल्लीत मी 'आदरणीय मोदीजी म्हणून हाक मारली तर बोलो पंकजा' म्हणून प्रतिसाद देण्यासाठी तुमचे मताधिक्य मला आवश्यक आहे. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी मी मते मागत आहे. या जिल्ह्यातील बहादर जनता कायम विकासासोबत चालणारी आहे, याचा मला विश्वास आहे असे सांगत त्या म्हणाल्या, परभणी,नांदेड लातूर असो की अन्य ठिकाणी महायुतीचे उमेदवार प्रचारासाठी मला येण्याचा आग्रह धरतात, कारण मी एक सर्व समावेशक चेहरा आहे याची जाणीव त्यांनाही आहे. माझ्यासमोर येणाऱ्यांना कधीही त्याची जात विचारत नाही. येणाऱ्या प्रत्येकाचे काम माझ्याकडून होईल का, यासाठी मी प्रयत्नशील राहते असे त्या म्हणाल्या.

मागे वळून पहा,मी केलेली कामेच दिसतील

तुम्ही मागे वळून पहा, तुमच्या गावासह वाडी- वस्ती-तांड्यासह ग्रामपंचायतमध्ये जा. तेथील विकास कामे दिसल्यानंतर तुम्हाला पंकजा मुंडेंची आठवण येईल. ज्या गावात मला ५० मते मिळाली आणि ज्या गावात ५० मते बाजूला गेली, तेथेही मी सारखीच विकास कामे केली. मंत्री असताना विकास कामात कधीही भेदभाव केला नाही. समोरचा माणूस कोणत्या पक्षाचा आहे हे मी पाहिले नाही,तर तो आपल्या राज्याचा आणि माझ्या जिल्ह्याचा आहे असे मी मानते. त्यामुळे जिल्ह्याच्या उज्वल भवितव्यासाठी आणि विकासाला पुढे घेऊन जाण्यासाठी मला निवडून द्या असे आवाहन पंकजा मुंडे यांनी केले.

खरा विकास पंकजाताईंच्याच काळात -आ.सुरेश धस

याप्रसंगी आमदार सुरेश धस म्हणाले पंकजाताई मुंडे या राज्य मंत्रिमंडळात चार खात्यांच्या मंत्री होत्या, त्यावेळी त्यांनी आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यासाठी प्रचंड मोठा निधी दिला. त्यांच्याच कार्यकाळात संपूर्ण राज्यात २५ हजार किलोमीटरचे रस्ते पूर्ण झाले. त्यात आपल्या मतदारसंघात सुद्धा गावांसह वाडी-वस्ती-तांड्यापर्यंत रस्त्यांची कामे मार्गी लागली. पंकजाताईंनी लक्ष घालून ही विकासाची सर्व कामे पूर्ण केली, त्यांनी कधीही भेदभाव केला नाही. प्रामाणिकतेने विकासाची कामे केली. बालकल्याण मंत्री असतानाही पंकजाताईंनी शिरूर कासार तालुक्यात मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी वेगवेगळ्या योजना राबवल्या. पीसीपीएनडीटी कायद्याची कडक अंमलबजावणी केली. ठोस निर्णय घेतले, त्यामुळे १००० मुलांमागे ६२८ इतकी अल्प मुलींची असलेली संख्या नंतर वेगाने वाढत गेली. जलसंधारण मंत्री म्हणून काम करताना पंकजाताईंनी ग्रामपंचायत पातळीवर विकासाच्या अनेक योजना राबवल्या.त्याबरोबरच सिमेंट बंधारे, सीसीटी डीपसीसीटी या सर्व कामांना पंकजाताईंनी मंजुरी देत निधी दिला. त्यांनी सातत्याने समाज हिताची कामे केली. त्यामुळे मतदान करताना सर्व समाज बांधवांनी अतिशय सकारात्मक राहून येत्या १३ मे रोजी कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून पंकजाताई मुंडे यांना बीड जिल्ह्याचे प्रतिनिधित्व संसदेत करण्यासाठी संधी द्यावी असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले. या सभेला जाटनांदूरसह परिसरातील चाहूरवाडी, भिलारवाडी, मोडजळवाडी पोखरवाडी आदी परिसरातील वाडी-वस्ती तांड्यावरील मतदार तसेच महायुतीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तोंडात सोन्याचा चमचा घेवून जन्मलेल्याना सामान्यांचे दुःख काय कळणार -बजरंग सोनवणे

बीड / गेवराई । प्रतिनिधी

मी शेतकरी कुटुंबात जन्माला आलो त्यामुळे शेतकऱ्याचा पुत्र असल्याने मला सर्वसामान्यांच्या वेदना माहित आहेत परंतु जे सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्मले त्यांना सामान्य शेतकरी शेतमजूर यांचे दुःख कसे समजू शकेल ? प्रश्नच माहित नसतील तर त्यांची सोडवणूक होईल का ? असा प्रश्न महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांनी गेवराई तालुक्यातील बागपिंपळगाव येथे मतदारांशी संवादादरम्यान कोणाचेही नाव न घेता उपस्थित केला.

यावेळी त्यांच्यासोबत माजी मंत्री आणि शिवसेनेचे नेते बदामराव आबा पंडित , राष्ट्रवादी किसान सेलच्या प्रदेशाध्यक्ष पूजाताई मोरे, शिवसेनेचे युवा नेते युद्धजीत दादा पंडित , माजी सभापती पंढरीनाथ लगड हे उपस्थित होते. गेवराई तालुक्यातील बागपिंपळगाव, बागपिंळगाव कॅम्प, गोपळवस्ती (बेलगांव),

बेळगाव, रामनगर तांडा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गट आणि महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे गावातून मतदारांच्या गाठीभेटी घेत मतदारांशी संवाद साधताना बजरंग बप्पा सोनवणे म्हणाले की ; हे सरकार शेतकऱ्यांच्या मालाला योग्य आणि रास्त भाव देण्यात अपयशी ठरलेले आहे. या सरकारने निवडणुकी पूर्वी दिलेली आश्वासने देखील पूर्ण केलेली नाहीत . तसेच मराठा आणि ओबीसी बांधवांची आरक्षणाची रास्त मागणी असताना देखील ते हा प्रश्न सोडवू शकलेले नाहीत . खा प्रीतम मुंडेंवर आरोप करताना ते म्हणाले कि जिल्ह्यातील असंख्य गावात त्या आल्याच नाहीत असे मतदारच आता सांगत आहेत आता पर्यंत खासदार कधी गावकऱ्याना दिसल्या नाहीत किंवा गावात आलेल्या नाहीत ? मग त्यांनी सांगत असलेला विकास कुठे झाला ? त्यांचा विकास निधी कुठे गेला ? या प्रश्नांची उत्तरे त्या कधी देणार असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला आहे म्हणून खऱ्या अर्थाने विकास पाहिजे असेल तर तुतारीधारी माणूस या चिन्हावर मतदान करण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले . यावेळी अशोक शेंडगे, बाबासाहेब कांबळे, बाबासाहेब सगळे, भीमा टाले, पिंगळे मामा, नामदेव कांबळे, रामप्रसाद राऊत, सखाराम मुगटवार आणि गावकरी सोबत होते.

पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ डॉ.योगेश क्षीरसागर यांचा बैठकांचा सपाटा

चौसाळा जिल्हा परिषद गटातील पदाधिकाऱ्यांशी साधला संवाद

बीड । प्रतिनिधी

महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी बैठक, कॉर्नर बैठकांचा सपाटा लावला आहे. त्यांनी बुधवारी (दि.१७) बीड तालुक्यातील चौसाळा जिल्हा परिषद गटातील प्रमुख सहकाऱ्यांची बैठक घेऊन संवाद साधला. यावेळी बोलताना त्यांनी आपण पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणार असल्याचे त्यांनी म्हटले.

डॉ. योगेश क्षीरसागर यांनी चौसाळा जिल्हा परिषद गटातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या

पदाधिकारी, कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधला. यावेळी सर्व सहकाऱ्यांनी पूर्ण ताकदीने कामाला लागावे. पंकजाताईंना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ.सारिकाताई क्षीरसागर, माजी पं.स.चे माजी सभापती काकासाहेब जोगदंड, शिवसेना मा.जिल्हाउपाध्यक्ष प्रा.आबासाहेब जाधव, मोहनराव झोडगे, अशोक सोनवणे, शुभम कातांगळे, सरपंच सुनिल अनपट, संतोष तांदळे, गणेश काकडे, राजाभाऊ क्षीरसागर, विवेक भोसले, पंकज शिंदे, मधुकर काळे, शहाजी चौधरी, बबलू शिंदे, अरुण सोनवणे, मोहन जोगदंड, अरुणकाका जोगदंड, सौ.फुलाबाई पवार, बालाजी ढास, इम्रान जागीरदार, अनिल पवार यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्याचा प्रवेश

चौसाळा येथील बैठकीत अंजनवतीचे उपसरपंच कृष्णा मोरे, ग्रा.पं. सदस्य पांडुरंग येडे यांच्यासह काही युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. याप्रसंगी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी त्यांचे स्वागत करून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

३९ बीड लोकसभा मतदार संघासाठी ३९ जणांनी घेतले ९२ नामनिर्देशन पत्र

नामनिर्देशनच्या पहिल्या दिवशी कोणाचाही अर्ज दाखल नाही

बीड । प्रतिनिधी

आजपासून ३९ बीड लोकसभा मतदारसंघात नामनिर्देशन पत्राचे वाटप सुरू झाले तथापि अर्ज दाखल करण्याच्या आजच्या पहिल्या दिवशी एकही अर्ज दाखल झालेला नाही. पहिल्या दिवशी ३९ व्यक्तींनी ९२ नामनिर्देशन पत्र घेतले.

आज निवडणुकीची अधिसूचना जारी झाली आहे. आजपासून त २५ एप्रिल पर्यंत, सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील जिल्हा नियोजन कार्यालयात नामनिर्देशन पत्र वाटप सुरू असणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे या निवडणुकीत उभे राहणाऱ्या उमेदवारांकडून भरलेले नामनिर्देशन पत्र सर्व कागदपत्रांसह स्वीकारतील. आज कोणत्याही उमेदवाराने

नामनिर्देशन पत्र दाखल केले नाहीत. नामनिर्देशन पत्रासोबत शपथपत्र(नमुना २६) हा २५ एप्रिल रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करावे लागणार आहेत.शपथपत्र अपूर्ण असल्यास दुसरे शपथ पत्र सादर करण्याची दिनांक २६ एप्रिल सकाळी ११.०० वाजेपर्यंत आहे. याच दिवशी मतदार यादीची प्रमाणित प्रत देखील दाखल करावी लागणार आहे. फॉर्म ए व फॉर्म बी २५ एप्रिल दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आहे. ३९ बीड लोकसभा मतदारसंघात सोमवार दिनांक १३ मे रोजी मतदान होणार आहे.

पंकजाताई किती दिवस रेल्वेचे गाजर दाखवत निवडणूका लढविणार?

शेतकरी पुत्र म्हणणाऱ्या बंजरंग सोनवणेंना दोन वर्षांपूर्वी शेतकरी ऊस प्रश्नी अडचणीत असताना दिसला नाही का?

माजलगावात राजेंद्र होके पाटील यांचा पत्रकार परिषदेत जळजळीत सवाल

लोकवर्गणीतून डिपॉजीट भरुन बीड लोकसभा अपक्ष लढविणारच!

माजलगाव । प्रतिनिधी

बीड लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे तुम्ही किती दिवस रेल्वेचे गाजर दाखवून निवडणूका जिंकणार आहात तसेच दोन वर्षापुर्वी माजलगाव विधानसभा मतदारसंघात उसाचा प्रश्न गंभीर बनला होता. शेतकरी बजरंग बप्पां सोनवणे यांच्याकडे जावून रडत होते.पण शेतकरी पूत्र म्हणवून घेणाऱ्या बजरंग बप्पा सोनवणेंना जराही पान्हा फुटला नाही. इतकंच नाही तर ह्याच बजरंग बाप्पां सोनवणेंनी माजलगावकरांनी भरभरून मतदान केलं होतं.पण हेच बजरंग बप्पा सोनवणे पाच वर्षात कधी धारूरच्या घाटाच्या खाली देखील उतरले नाहीत. त्यामुळे बजरंग बाप्पा सोनवणेनां मराठा आरक्षणाच्या गरम तव्यावर पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करू नये. बजरंग सोनवणे

ज्या पक्षाकडून उभे राहाणार आहेत त्या पक्षाचा 'सगे सोयरे' या मागणीला पाठींबा आहे का? पाठींबा नसेल तर केवळ जातीजातीत भांडण लावून मराठा समाजाची मत मागायचा बजरंग बाप्पां सोनवणेंना काहीच अधिकार नाही असा प्रश्न माजलगावचे मराठा आंदोलक राजेंद्र होके पाटील यांनी केला आहे.आम्ही मराठा आरक्षणासाठी खस्ता खाल्या, कित्येक केसेसे अंगावर घेतल्या. चारपाचशे तरूण पोरांची कुटुंब या आंदोलनात उध्दवस्त झाले आहेत. ◀◀ पान ३ वर

लोकवर्गणीतून डिपॉझिट भरणार

राजेंद्र होके हा सगळ्या आठरा पगड जाती धर्माच्या लोकांच्या कायम कामाला आलेला माणूस आहे.जय महेश कारखान्याची कोट्यावधी रुपयांचे ऊस बील शेतकऱ्यांना मिळवून दिलेला हा राजेंद्र होके आहे. मराठा आरक्षण आंदोलनात सहा महिने घरदार सोडून राहावे लागले होते. माझ्यासह दोन चारशे पोरं त्यावेळी

फरार होते.पण साधा एकही नेता आमच्या घरादाराकडे फिरकला नाही. साधी विचारपूस कोणी केली नाही. आमचे दुःख आम्ही भोगले.तब्बल सहा महिन्यानंतर आमच्या जामीन झाल्या त्यामुळे कोणता पक्ष आणि कोणताच नेता मराठा समाजाच्या फायद्याचा नाही. माझे योगदान लक्षात घेऊन माजलगावची जनता माझ्यासाठी लोकवर्गणी गोळा करून माझं डिपॉझिट भरणार आहे.कोणीही पंतप्रधान होऊ दे त्यांच्या डोळ्यात डोळे घालून बोलणारा हा राजेंद्र होके पाटील आहे. आठरापगड जातीधर्मातील सर्व सामान्यांच्या विकासासाठी, मराठा आरक्षणासाठी, शेतकरी प्रश्नांसाठी, माझी उमेदवारी असणार आहे, असेही राजेंद्र होकेम्हणाले.

माझ्या विकास कामांचे रेकॉर्ड समोर ठेवून मला भरघोस मतांनी संसदेत पाठवा

प्रज्ञावंतांच्या मेळाव्यात महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

मी राजकारणात कधीही कुठला भेदभाव केला नाही. तुम्हीही मतदार म्हणून करणार नाहीत याची खात्री आहे.उमेदवार म्हणून आपणास पसंत आहे, त्यामुळे देशाच्या सर्वोच्च सभागृहात काम करण्याची संधी मला द्या. संसदेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करताना बीड जिल्ह्यात येणाऱ्या पाच वर्षात उद्योग व्यवयाय आणून १० हजार रोजगार उपलब्ध करेल. तसेच बीडमध्ये मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणेल. याबरोबरच जिल्ह्यात मोठे मेडिकल कॉलेजला मंजुरी आणतांनाच जिल्हा दुष्काळ मुक्त करण्यासाठी काम करणार आहे. त्यामुळे मतदार म्हणून विकासाच्या कामांना आपले भरीव

योगदान देण्यासाठी तुमचे मतरुपी सत्पात्री दान माझ्या पदरात टाका असे आवाहन भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांनी आज येथे केले. माझ्या मंत्रिपदाच्या काळातील विकास कामांचे रेकॉर्ड समोर ठेवून तुम्ही मला भरघोस मतांनी निवडून द्या असेही त्या म्हणाल्या.

भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ आज सूर्या लॉन्स येथे प्रज्ञावंतांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. व्यासपीठावर उमेदवार आ. सतीश चव्हाण, माजी आमदार अमरसिंह पंडित, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष योगेश क्षीरसागर, दिपक घुमरे, भाऊसाहेब नाटकर, मुजीब पठाण आदी उपस्थित होते.

यावेळी पंकजाताई मुंडे म्हणाल्या, आपण समाजाचे खरे मार्गदर्शक आहात. सर्वजण सुशिक्षित आहेत. उमेदवार म्हणून माझ्या पक्षाने माझी जी निवड केली आहे, ती सार्थ करण्यासाठी मला प्रचंड मताधिक्य देऊन निवडून द्या. माझ्यासाठी आपले योगदान खूप महत्त्वाचे आहे, ते तुम्ही द्या. आपला उमेदवार म्हणून मी संसदेत बीड जिल्ह्याच्या विकासाचे भरीव काम करून दाखवेल. मी कायम तुमच्यासोबत असेन, तुमचे सर्व प्रश्न सोडवण्यासाठी मी कटिबद्ध राहील असे सांगत पंकजाताई मुंडे यांनी उमेदवार का आणि कसा निवडावा यावर उपस्थितांशी संवाद साधला.

पंकजाताईंमध्ये विकास करण्याची धमक - आ.सोळंके, आ. चव्हाण

राज्य शासनाच्या योजना केंद्र सरकारच्या सहकार्याने राबवण्यासाठी पंकजाताई मुंडे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्या असे आवाहन आ.प्रकाश सोळंके, आ. सतीश चव्हाण यांनी यावेळी केले.पंकजाताई मुंडे यांचेकडे तत्परतेने विकास कामे करण्याची हातोटी आहे असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. जागृत मतदार म्हणून ही निवडणूक आपण सर्वांनी आपण स्वतः उमेदवार असल्याचे समजून पंकजाताई मुंडे यांना मतदान करावे.पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या रूपाने कणखर नेता देशाला पुन्हा हवा आहे त्यासाठी बीडमध्ये पंकजा मुंडे यांना निवडून देणे गरजेचे आहे. आज मोदींनी जगात भारताचा दबदबा निर्माण केला आहे असे ते म्हणाले.

युतीच्या उमेदवाराला मुस्लिम मतांची गरज नाही - आ.संतोष बांगर

हिंगोली । प्रतिनिधी

लोकसभेचे एनडीएचे उमेदवार शिंदे शिवसेनेचे उमेदवार बाबुराव कदम कोहळीकर यांच्या प्रचार कार्यालयाचे वसमत येथे उद्घाटन झाले. या प्रसंगी शिंदे गटाचे आमदार संतोष बांगर यांनी मुस्लिम मतांची आम्हाला गरज नसल्याचे जाहीर सभेत सांगितले.

त्यामुळे हिंगोली लोकसभेतील शिंदे गटाचे व युतीचे उमेदवार बाबुराव कदम यांना मुस्लिमांच्या मतांची गरज नसल्याचे जाहीरपणे सांगितल्याने हिंगोली लोकसभेतील मुस्लिम मतदार नाराज झाला असून शिंदे गटाच्या युतीच्या उमेदवाराविरुध बोलताना दिसत असून निवडणूक आचारसंहितेत जातीच्या नावावर मते मागता येणार नाहीत. वरील घटनेनंत आचारसंहितेचे उल्लंघन झाले असून यावर हिंगोली लोकसभा

मतदारसंघाचे निवडणूक अधिकारी काय भूमिका घेतात याकडे अल्पसंख्याक मतदारांचे लक्ष लागले आहे. मुस्लिम समाजाबद्दलचे वरील वक्तव्य एखाद्या सामान्य कार्यकर्त्याने वापरले असते किंवा विरोधी पक्षाच्या नेत्याने वापरले असते तर त्यावर निवडणूक अधिकारी यांनी तात्काळ दखल घेतली असती, अशी चर्चा हिंगोली मतदारसंघातून होत आहे. वरील प्रकरणाची दखल घेत निवडणूक आयोग या प्रकरणावर काय निर्णय घेतो याकडे मुस्लिमांचे लक्ष लागले असून, या मतदारसंघात मुस्लिमांना मतदानापासून वंचित ठेवण्याच्या चर्चाही ऐकायला मिळत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

निवडणुकीच्या कामकाजात टाळाटाळ

खडकवासला विधानसभा मतदारसंघातील सहा कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित

पुणे । प्रतिनिधी

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कामकाजात टाळाटाळ केल्याप्रकरणी खडकवासला विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून नियुक्त सहा कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजय आसवले यांनी दिली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कै. ह. तू. थोरवे प्राथमिक विद्यालय शाळा क्र. १६२ बी व विद्या निकेतन १९ चंद्रभागनगर कात्रज या शाळेतील शिक्षकांना निवडणूक कामकाजाकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून आदेश बजावण्यात आले होते. या कर्मचाऱ्यांनी वारंवार संधी देऊनही त्यांना नियुक्त केलेल्या भागाचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून आपले निवडणूक कर्तव्य पार पाडण्यात अक्षम्य दुर्लक्ष, कुचराई, दिरंगाई केल्याच्या कारणास्तव त्यांच्याविरुद्ध लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० कलम ३२ अन्वये निलंबनाची कारवाई प्रस्तावित करावी असे निर्देश पुणे महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. यापुढेही निवडणूक कामकाजात टाळाटाळ करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यासह कडक कारवाई करण्यात येईल, असेही श्री. आसवले यांनी स्पष्ट केले आहे.

उच्च न्यायालयाने मेट्रो आणि उड्डाणपुलाच्या कामात अडथळा ठरणारी ७२ झाडे काढण्यावरील स्थगिती उठविली

पुणे । प्रतिनिधी

मेट्रोमार्ग आणि दुमजली उड्डाणपुलासाठी गणेशखिंड रस्ता रुंदीकरणात बाधा ठरणार्या ७२ झाडांचे पुर्नरोपण करण्याच्या अटीवर उच्च न्यायालयाने ही झाडे काढण्यास आज परवानगी दिली. यामुळे गणेशखिंड रस्ता रुंदीकरणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

गणेशखिंड रस्त्यावर मेट्रो क्र.३ मार्गीकेचे काम सुरू आहे. तसेच या रस्त्यावर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकामध्ये दुमजली उड्डाणपुल उभारण्यात येत आहे. उड्डाणपुलाच्या या कामामुळे पुलाच्या दुतर्फा राहाणार्या रस्त्याची रुंदी कमी असल्याने महापालिकेने विकास आराखड्यानुसार गणेशखिंड रस्ता ४५ मी. रुंद करण्याचे काम हाती घेतले आहे. रस्तारुंदीमुळे बाधित होणार्या मिळकतींचा ताबा घेउन रुंदीकरणाचे काम सुरू करण्यात आले आहे. परंतू याठिकाणी असलेली झाडे काढण्यास पर्यावरण प्रेमींनी विरोध केल्याने मागील सहा महिन्यांहून अधिक काळ हे

काम रखडले होते. त्यामुळे काम सुरू असताना अस्तित्वात असलेल्या रस्त्यावरुन वाहतूक सुरू ठेवावी लागत असल्याने प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे.

दरम्यान, रस्ता रुंदीकरणात बाधीत होणारी झाडे काढण्याचे काम सुरू असताना पर्यावरण प्रेमींनी त्याला विरोध केला. महापालिकेने ही झाडे काढताना तांत्रिक प्रक्रिया राबविली. यावर आक्षेप घेतलेल्या नागरिकांचे म्हणणे ऐकून न घेता एकतर्फी सुनावणीची प्रक्रिया उरकून झाडे काढण्यास सुरूवात केल्याचा आरोप करत परिसर संस्थेच्यावतीने रणजित गाडगीळ यांनी महापालिके विरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली.

झाडे काढण्यास स्थगिती देतानाच उच्च न्यायालयाने यावर तज्ज्ञांची समिती नेमून अहवाल

सादर करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार महापालिकेने तज्ज्ञांची समिती नेमून समितीने तयार केलेला अहवाल स्वीकारला. समितीच्या अहवालावरून आज उच्च न्यायालयाने या रस्त्यावरील काढाव्या लागणार्या ७२ झाडांचे पुर्नरोपण करण्याच्या अटीवरच स्थगिती उठविली, अशी माहिती महापालिकेच्या विधी अधिकारी निशा चव्हाण यांनी दिली. आज न्यायालयातील सुनावणीस ऍड. नीशा चव्हाण यांच्यासह पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर आणि याचिकाकर्ते रणजीत गाडगीळ देखिल उपस्थित होते. या झाडांचे पुर्नरोपण करून त्याचा अहवाल देखिल सादर केला जाईल असे प्रतिज्ञापत्र घेतल्यानंतरच न्यायालयाने स्थगिती उठविली.

जिल्हा विशेष लेखापरीक्षकांचे कार्यालय अखेर स्वारगेटलाच..

पुणे । प्रतिनिधी

पुणे विभागीय सहनिबंधक कार्यालयाच्या अधिपत्याखालील जिल्हा विशेष लेखापरीक्षक वर्ग १ व अधिनस्त ७ कार्यालये विमाननगर येथील जागेत स्थलांतरित करण्याचा निर्णय विविध संघटनांच्या विरोधामुळे शासनाने अखेर रद्द केला आहे. त्याऐवजी स्वारगेटजवळील पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या नवीन जागेत स्थलांतरावर राज्य सरकारने शिक्कामोर्तब केल्यामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

विमाननगर येथे कार्यालय हलविण्यास कर्मचारी संघटनांनी विरोध केला आणि मंत्रालय स्तरावरही पाठपुरावा केला. त्यामध्ये प्रामुख्याने राज्य सरकारी गट-ड (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी मध्यवर्ती महासंघ, नागपूर येथील महाराष्ट्र स्टेट को-ऑप.

डिपार्टमेंट ऑडिटर्स असोसिएशनचा समावेश आहे. संघटनांच्या विरोधाच्या भूमिकेस दै. 'पुढारी'ने सातत्याने आवाज उठविला. अखेर त्याची दखल शासनाने घेत स्वारगेटच्या जागेवर शिक्कामोर्तब केल्याचे स्पष्ट झाले आहे.

याबाबतची माहिती अशी की, जिल्हा विशेष लेखापरीक्षकांचे कार्यालय सध्या मार्केट यार्डातील भू-विकास बँकेच्या इमारतीत भाड्याने कार्यरत आहे. ही जागा पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेस (पीडीसीसी) विक्री केल्याने व करार संपल्याने नव्या जागेचा शोध घेण्यात आला. आता विमाननगरऐवजी स्वारगेटच्या जागेवर शासनाने शिक्कामोर्तब अंतिम करीत १६ एप्रिल रोजी शासन आदेश जारी केला आहे. त्यानुसार पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या स्वारगेट येथील कमर्शिअल इमारत क्रमांक १, चौथा मजला येथे ३५.१७ रुपये दराने एकूण १२ हजार ३६२ चौरस फूट जागेचे भाडे संबंधित घरमालकाला देण्यास शासनाने काही अटींवर प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे.

२१० मुलांची रेल्वेकडून घरवापसी

पुणे स्थानकावर उभारला जाणार चाइल्ड लाइन कक्ष

पुणे । प्रतिनिधी

घरी न सांगता, रागाच्या भरात घराबाहेर पडलेली आणि पुणे रेल्वे स्थानकावर प्रशासनाला सापडलेल्या सुमारे २१० मुलांची घरवापसी या आर्थिक वर्षात करण्यात आली. या कामात रेल्वे प्रशासन, आरपीएफ, लोहमार्ग पोलिस, साथी चाइल्ड लाइनच्या प्रयत्नांतून यश मिळाले. या कामाला आता आणखी गती देण्यात येणार असून, पुणे रेल्वे स्थानकावर नव्याने चाइल्ड लाइनच्या कक्षाची स्थापना केली जाणार आहे.

हरवलेल्या मुलांना मदत करणार्या साथी संस्थेचा कक्ष रेल्वेकडून हलवण्यात आला होता. तसेच, या संस्थेचे कामदेखील बंद केले होते. त्यामुळे घरातून निघालेली अनेक मुले पालकांपर्यंत पोहोचू शकली नाहीत. आता रेल्वेकडून पुण्यातील या संस्थेचे काम सुरू केले गेले आहे. त्यामुळे पुढील काही वर्षांमध्ये हरवलेल्या मुलांना पुन्हा



आपल्या पालकांपर्यंत सुखरूपपणे पोहोचविता येणार आहे. या कक्षासाठी पुणे रेल्वे स्थानकावर नव्याने जागा निश्चित करण्यात आली आहे. येत्या एक ते दोन आठवड्यात साथी संस्थेचा कक्ष उभारण्यात येणार आहे. यासंदर्भात नुकतीच साथी संस्थेची, रेल्वे सुरक्षा बल, जीआरपी यांची रेल्वेच्या अतिरिक्त विभागीय व्यवस्थापक बृजेश कुमार सिंह यांच्यासोबत बैठक झाली, त्या वेळी कक्ष उभारण्यासंदर्भात चर्चा झाली

अनिस सुंडकेंना एमआयएमची उमेदवारी; पुण्यात चौरंगी होणार

पुणे । प्रतिनिधी

पुणे लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडी, महायुती आणि वंचित बहुजन आघाडीने उमेदवार जाहीर केल्यानंतर आता एमआयएमने ही महापालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अनिस सुंडके यांना

उमेदवारी दिली आहे. यामुळे पुणे लोकसभेची निवडणूक चौरंगी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुणे लोकसभेसाठी भाजप महायुतीकडून माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी दिली असून, काँग्रेस महाविकास आघाडीने कसब्याचे आमदार रवींद्र धंगेकर यांना उमेदवारी दिली आहे. कोणत्याही परिस्थितीमध्ये निवडणुकीच्या रिंगणात उतरायचेच, असा निश्चय केलेल्या वसंत मोरे यांना वंचित बहुजन आघाडीने उमेदवारी दिली. त्यामुळे ही निवडणुक तिरंगी होणार, असा कयास बांधला जात असतानाच, एमआयएमने स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अनिस सुंडके यांना उमेदवारी देत निवडणुकीच्या रिंगणात उतरविले आहे. त्यामुळे पुण्याची लोकसभा निवडणूक चौरंगी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

खासदार सुप्रिया सुळे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

पुणे । प्रतिनिधी

महाविकास आघाडीच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. संविधानाचे शिल्पकार डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे आशीर्वाद घेऊन मी लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवात सहभागी होत आहे अशी प्रतिक्रिया सुळे यांनी यावेळी व्यक्त केली.

याप्रसंगी काँग्रेसचे जेष्ठ नेते बाळासाहेब थोरात, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पुणे जिल्हा संपर्क प्रमुख व आमदार सचिन अहिर, सुषमा अंधारे, माजी मंत्री व आमदार विश्वजित कदम, खासदार व शिरूर लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ अमोल कोल्हे, आमदार संग्राम थोपटे, आमदार संजय जगताप, आमदार अशोक पवार, माजी

आमदार जयदेव गायकवाड, युगेंद्र पवार आदी उपस्थित होते.

सुळे म्हणाल्या, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष- शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने महाविकास आघाडीची अधिकृत उमेदवार म्हणून मी बारामती लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवित आहे. या निवडणूकीचा उमेदवारी अर्ज आज विधान भवन येथे पवार साहेब व त्यांच्यावर प्रेम करणारी जनता, महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या साक्षीने दाखल केला. जनतेची सेवा, महिला, शेतकरी, कष्टकरी, कामगार यांचा सन्मान आणि महाराष्ट्राचा स्वाभिमान कायम बुलंद राखण्यासाठी मी लढत आहे. या लढतीत मायबाप जनता माझ्या सोबत राहिल याची मला खात्री आहे.

अजितदादांनी तंबी देऊनही राष्ट्रवादीतील कार्यकर्ते आजही माझ्या संपर्कात : संजोग वाघेरे

पुणे । प्रतिनिधी

अजित पवारांनी मावळ लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांना भेटू नका, अशी तंबी त्यांच्या कार्यकर्त्यांना दिली आहे. मात्र तरीही राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते माझ्या संपर्कात आहेत. मला भेटत आहेत, असा गौप्यस्फोट महाविकास आघाडीचे मावळमधील उमेदवार संजोग वाघेरे यांनी केला आहे. ते एका वृत्तवाहिनीशी बोलत होते.

मावळमध्ये महायुतीकडून शिवसेना शिंदे गटाचे श्रीरंग बारणे तर महाविकास आघाडीकडून शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे संजोग वाघेरे निवडणूक रिंगणात आहेत. ठाकरे गटाच्या संजोग वाघेरे यांनी केलेल्या या वक्तव्याने मावळच्या राजकारणात वेगळीच चर्चा सुरू झाली आहे.

संजोग वाघेरे हे एकसंघ राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असताना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत महत्त्वाची पदे भुषविली होती. आता ते ठाकरे गटाचे उमेदवार असल्याने महायुती आणि अजित पवारांची राष्ट्रवादी त्यांची

विरोधक आहे. मात्र, संजोग वाघेरे यांची जुन्या पक्षाशी संपर्क तुटलेला नाही. याचा फायदा मावळ लोकसभेच्या निवडणुकीत संजोग वाघेरे यांना होईल, अशी येथे चर्चा आहे.

सध्या मावळ मतदार संघातील बारणे विरूद्ध वाघेरे यांच्यातील लढत चर्चेत आहे.

संजोग वाघेरे यांनी आपला प्रचार आता आक्रमक केला असून ते मतदारसंघातील अनेक प्रलंबित प्रश्न उपस्थित करून श्रीरंग बारणे यांना अडचणीत आणण्याचा प्रयत्न करत आहेत. यामध्ये यश येतानाही दिसत आहे.

उत्तम जानकर, धैर्यशील मोहिते पाटील यांनी घेतली शरद पवारांची भेट

पुणे । प्रतिनिधी

माढा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील आणि त्यांचे विरोधक असलेले उत्तम जानकर पुण्यात एकत्र बघण्यास मिळाले. तुतारी हाती घ्यावी, अशी कार्यकर्त्यांची इच्छा असल्याचे सूचक विधान जानकर यांनी केले असून, लवकरच भूमिका जाहीर करणार असल्याचेही सांगितले. दरम्यान, मोहिते पाटील यांचे पारंपरिक विरोधक आणि सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये (अजित पवार) असलेले उत्तम जानकर यांनी बुधवारी (दि. १७) शरद पवार यांची त्यांच्या पुण्यातील निवासस्थानी भेट घेतली.

मोहिते पाटील यांचे कट्टर विरोधक म्हणून उत्तम जानकर यांना ओळखले जाते. नुकतीच त्यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र

फडणवीस यांची देखील भेट घेतली होती. त्यानंतर लगोलग राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतल्याने त्यांच्या प्रवेशाच्या चर्चा सुरू झाल्या आहेत. या भेटीप्रसंगी धैर्यशील मोहिते पाटील देखील उपस्थित होते. आपण कार्यकर्त्यांशी बोलून येत्या शुक्रवारी (दि. १९) भूमिका जाहीर करणार असल्याचे जानकर यांनी सांगितले, तर मोहिते पाटील आणि जानकर या दोघांनी आम्ही एकत्र येऊन काम करावे, अशी पवारसाहेबांची इच्छा असल्याचे सांगितले.जानकर म्हणाले, मोहिते पाटील आणि आमच्यातील वैर संपून निवडणुकीत एकत्र यावे, असे शरद पवारांचे मत होते. पण, आम्ही एकमेकांविरोधात लढलो असल्याने अनेक अडचणी आहेत. त्या अडचणी सोडण्याबाबत एक बैठक झाली आहे. दोन-तीन दिवसांत दुसरी बैठक होणार आहे. एकमेकांना सहकार्य होऊ शकते का? मोहिते पाटील आणि आमच्यातील वैर कसे थांबणार आणि काही कामांबद्दल बैठकीत चर्चा झाली. नागपूरला जाण्यासाठी केलेला विमान खर्च वाया जाणार का? या प्रश्नावर जानकर म्हणाले की, विमानात आमच्या कार्यकर्त्यांना बळ देण्यासाठी चर्चा झाली. विमानात झालेले मुद्दे १९ एप्रिलला कार्यकर्त्यांसमोर मांडण्यात येणार आहेत, त्यानंतर कार्यकर्ते घेतील त्या निर्णयाबरोबर राहणार आहे. तुतारी हाती घ्यावी, अशी काहींची इच्छा आहे. पण, अन्य काही कार्यकर्त्यांची मतमतांतरे असू शकतात. विरोधकांबरोबर जाणे, हे थोडे अवघड काम आहे. मी कुठल्याही पक्षात प्रवेश करणार नाही. देवेंद्र फडणवीसांच्या सांगण्यावरून मी अजित पवारांच्या पक्षात आहे, असेही जानकर यांनी सांगितले.

खा. सुप्रिया सुळेंना धक्का : महाविकास आघाडीतून कुलदीप कोंडेंचा महायुतीत प्रवेश

पुणे । प्रतिनिधी

सलग दोन वेळा भोर विधानसभेची आमदारकी लढवणारे ठाकरे गटाचे शिवसेनेचे नेते कुलदीप कोंडे यांनी महाविकास आघाडीतून बाहेर पडले असून शिंदे गटाच्या शिवसेना पक्षामध्ये मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला. कोंडे यांच्या पक्षप्रवेशामुळे सुप्रिया सुळे यांना मोठा धक्का बसला आहे.

महाविकास आघाडीतील धुसफूसमुळे भोरमध्ये ठाकरे गट अस्थिर होता. त्यातच खासदार सुप्रिया सुळे यांनी विधानसभेची उमेदवारी जाहीर केल्याने मतभेदात आणखी भर पडली होती. कुलदीप कोंडे सह त्यांचे कार्यकर्ते नाराज झाले होते. या पार्श्वभूमीवर सर्वप्रथम वृत्तपत्रात सोमवार (दि. १५) रोजी महाविकास आघाडीमध्ये बिघाडी होण्याची शक्यता या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध केले होते. पुणे येथे झालेल्या महायुतीच्या जाहीर सभेत ठाकरे गटाचे शिवसेना नेते कुलदीप कोंडे यांनी शिंदे गटाच्या शिवसेना पक्षात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माझी जलसंपदा मंत्री विजय शिवतारे, रिपब्लिकन पक्षाचे नेते रामदास

आठवले यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला आहे. यामुळे खासदार सुप्रिया सुळे यांचे मोठ्या प्रमाणात मताधिक्य घटणार असल्याचे राजकीय विश्लेषक अंदाज लावत आहे. तसेच आगामी भोर विधानसभेच्या निवडणुकीसाठी ठाकरे गट आणि शिवसेना मधील काहींनी गुडघ्याला बाशिंग बांधले होते. त्यांच्या मात्र भुवया उंचावल्या असल्याची चर्चा झडत आहे.

कुलदीप कोंडे हे शेतकरी कुटुंबातील असून कोणताही राजकीय वारसा नसताना केळवडे गावच्या उपसरपंच पदापासून ते दोन टर्म जिल्हा परिषदेवर पकड ठेवली आहे. पहिल्या टर्मला सन २०१२ मध्ये ते स्वतः जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले होते. तर दोन पंचायत सदस्य निवडून आणून भोर पंचायत समितीवर भगवा फडकवला होता. २०१७ मध्ये त्यांच्या पत्नी शलाका कोंडे या जिल्हा परिषद सदस्या म्हणून निवडून आल्या होत्या. तर पंचायत समितीवर एक सदस्य निवडून आणून महामार्ग पट्ट्यात आपली पकड कायम ठेवली आहे. मागील विधानसभेच्या निवडणुकीत थोपटे आणि कोडे यांच्यात दुसऱ्यांदा दुरंगी लढत झाली. या अटीतटीच्या नवतीत एकूण ३,६१,७६४ मतदानापैकी २.२८.२६४ मतदान झाले. यात आमदार थोपटे यांना १०८९२५ झाले ४७.७२ टक्के मतदान तर कोडे यांना ९९७१६ म्हणजे ४३.६९ यके मतदान झाले. अत्यंत चुरशीच्या या लढतीत ९२०६ मतानी आमदार थोपटे विजयी झाले होते. एकंदरीत केवळ कोंडे यांचा साडेचार हजाराच्या फरकाने पराभव झाला होता.